म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक रि. रा. गायकवाड | सन |
| --- | --- | --- |
| भू-प्रवास | पुस्तकाचें नांव श्री कुणकेश्वर माहात्म्य व त्याच्या जीर्णोद्धाराविषयी विचार | १८८३ |
| संग्रहालय क्रमांक ५८ ३२ | | |

५८
संक्र. (भु प्रवास)

श्रीकुणकेश्वर माहात्म्य व त्याच्या जीर्णोद्धाराविषयी विचार.

अनु - ५६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करा

मा. ग्रं. सं. 32

वा. मु. ग्र. 32

आ. भू. प्र 32
३३५०

# श्रीकुणकेश्वरमाहात्म्य

व

# त्याच्या जीर्णोद्धाराविषयीं विचार.

हा निबंध

सिताराम रामचंद्र गाइकवा

यांनीं तयार करून

मुंबईंत

इंडियन प्रिंटिंग छापखान्यांत छापवून प्र

सन १८८३ इसवी.

गाइकवाड.

किंमत ८ आणे.

हिंदुधर्माचे पूर्ण अभिमानी ती॰ रा. पांडुरंग
नागोजी राणेराव ऊर्फ दाजी साहेब ना-
रिंग्रेकर मिराशी पटेल पेनशनर पोली-
स अंमलदार यांनीं माझें पुत्रवत्
पालन करून वियादि शि-
क्षण दिल्यावरून हें अ-
ल्पमातिनें तयार केलेलें
लहानसें पुस्तक त्यां-
स परम आदरा-
नें नजर के-
लें असे.

सि॰ रा॰ गाइकवाड.

# प्रस्तावना.

कोंकणपट्टींतील माझ्या किसेक मित्रांच्या सूचनेवरून मीं हा लहानसा निबंध तयार केला आहे.

या देवस्थाना संबंधाची पुरातन व कांहीं अर्वाचीन माहिती तेथील कांहीं लोकांच्या साह्यानें व कांहीं जुन्या ग्रंथाधारें मिळविली आहे, तसेंच हा निबंध छापून प्रसिद्ध करण्याचे कामीं कांहीं लोकांकडून द्रव्यद्वाराही मदत मिळाली आहे.

पुस्तकाच्या विक्रीच्या पैशापासून फायदा करून घेण्याचा माझा मुळींच उद्देश नसून 'हे पैसे श्रीकुणकेश्वराचे कामीं लावावयाचे' असा कृतनिश्चय झाला आहे, तेव्हां या सत्कृत्याचे कामीं देशबांधव मला योग्य मदत करतीलच.

महाराष्ट्र भाषेची अशा प्रकारची सेवा करण्याचा हा माझा पहिलाच प्रयत्न आहे, तेव्हां यांत पुष्कळ ठिकाणीं भाषासौरस्याची वगैरे उणीव वाचकांस आढळल्यास त्याबद्दल व किसेक प्रसंगीं कोणाला अनुलक्षून कमीजास्त मजकूर असल्यास त्याबद्दल प्रियवाचक क्षमा करितील अशी आशा आहे.

या पुस्तकासंबंधानें या शिवाय आणखी कांहीं माहिती वैगेर कोणी कळविल्यास सुदैवानें दुसरी आवृत्ति काढण्याचा प्रसंग आला असतां त्याबद्दल अवश्य विचार केला जाईल.

हें पुस्तक तयार करण्याच्या कामीं रा, रा. विष्णु पांडुरंग राणे व रा. रा. दिनकर गणेश पेंढरकर येथील तिसऱ्या नंबरच्या शाळेचे हेडमास्तर यांनीं मला पुष्कळ मदत केली त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. सि. रा. गा.

सोलापूर, ता. १९ आगष्ट १८८३.

आ.श्रु.ग्रं. 32
१
७२५

# श्रीकुणकेश्वर माहात्म्य

आणि

# त्याच्या जीर्णोद्धाराविषयीं विचार.

## भाग १.

### देवालयाचें वर्णन.

जन्मा आलीयाचें फळ। कांहीं करावें सफळ ॥
ऐसें न करितां निष्फळ। भूमिभार होय ॥ १ ॥

रामदास.

वरील देवस्थान रत्नागिरी जिल्ह्यांतील देवगड नामक तालुक्यांत आहे. हें समुद्रकांठीं अगदीं एकांत स्थळीं असून उंचवट्यावर बांधिलेलें आहे. ह्याच्या पायथ्यास समुद्राच्या लाटा धो धो आपटत असतात. याचीं शिखरें नभोमंडळास पोंहचलीं आहेत; त्यामुळें भाविक वगैरे जनांस याचा देखावा फार दुरून नजरेस पडूं लागतो. मुंबई व गोंवें यांच्या दरम्यान जाणाऱ्या येणाऱ्या हेटच्या गलबतांवरील भाविक उतारू लोक ह्या देवळाचीं शिखरें नजरेस पडतांच मोठ्या भक्तियुक्त अंतःकरणानें त्याच्या पायां पडतात, व कित्येक ह्या देवाच्या नांवानें समुद्रांत नारळ टाकितात. दर्यावर्दी लोक एखाद्या वादळा-

च्या झपाट्यांत सांपडले कीं प्रथमतः ह्याच देवाची आराधना करून यास नवस वगैरे बोलत असतात.

ह्या देवळाचा घेर औरसचौरस सुमारें एक बिघ्याचा आहे. ह्याचें बांधकाम बरेंच ऐटबाजीचें केलेलें आहे; गाभाऱ्याचें शिखर फार उंच असून तें बदामी आकाराचें बांधिलें आहे. ह्या देवालयाचे निरानिराळे चार भाग केले आहेत, ते येणेंप्रमाणें:– १ देवाचा गाभारा, २ मुंगसाल, ३ विश्रांतिस्थळ, व ४ सभामंडप. शेवटचा भाग ( सभामंडप ) अगदीं पडला आहे, व त्याची गणना हल्लीं आंगणांत सामील झाली आहे. हा सभामंडप जरी अगदीं ढांसळला आहे तथापि याचा जो कांहीं भाग हल्लीं शेष राहिला आहे, तो त्याच्या पूर्वींच्या वैभवाची साक्ष देत आहे. ह्या जागजे हल्लींच्या सभामंडपांत खुशाल हजार बाराशें माणसें बसतील, इतका तो मोठा आहे. दुसरा भाग जो मुंगसाल याचेंही बांधकाम अगदीं जीर्ण झालें आहे, परंतु सभामंडपाप्रमाणें अगदीं धुळीस मिळण्यासारखी याची स्थिति नाहीं.

कोंकणांत जांबे दगड सर्वत्र सांपडतात, हें तर प्रसिद्धच आहे. हे दगड तांबूस रंगाचे असून विटे सारखे ठिसूळ असतात. ह्याच दगडांची योजना या देवालयाच्या भिंतींस केली आहे. काळे दगडही क्वचित् बळकटीच्या ठिकाणीं लाविले आहेत. ते दगड अन्य मुलुखांतून आणिले असावे, कारण कोंकणांत तसला दगड क्वचित् आढळतो, जांबे दगडाच्या बांध-

कामावरून चुन्याची तांबूस रंगाची कपलाद केली आहे. तीस जरी फार वर्षें झालीं आहेत तथापि कोठें कोठें तींत चेहरा बघून घ्यावा; इतकी ती अझून तुळतुळीत आहे. ह्याचप्रमाणें कोंकणांतील बहुतेक जुनाट देवालयांच्या भिंतींच्या कपलादी आहेत. ह्या कपलादींची शोभा कशी रम्य असते याचें प्रत्यंतर ज्यांस पहाणें असेल त्यांनीं विजापूर शहर पहावें. तेथील इमारतींच्या भिंतींवर जेव्हां सूर्यकिरण पडतात, तेव्हां त्या भिंगाप्रमाणें चमकत असतात.

श्रीकुणकेश्वराच्या देवालयाच्या पूर्वेस तीन देवळें बरींच मोठीं आहेत; त्यांचेंही काम पहाण्यासारखें आहे. परंतु तीं थोडक्याच काळांत राम ह्मणतील असें हल्लींच्या त्यांच्या स्थितीवरून वाटतें. त्यांपैकीं गणपतीचे देवळाचा भाग बराच ढांसळत चालला आहे; व जर त्याचा जीर्णोद्धार लौकर न होईल तर तें आपल्या धन्यासह लौकरच वैकुंठीं जाणार असें दिसतें. असें सांगतात कीं, दुसरें जें श्रीहरीचें देऊळ आहे, तें नारिंग्रेकर राणेराव ह्यांच्या मूळपुरुषानें बांधिलें आहे. असें जर आहे तर ते लोक ह्यास ऊर्जितदशा कां बरें आणीत नाहींत? कारण यांचें घराणें श्रीहरीच्या दयेनें हल्लीं बऱ्याच भरभराटींत आहे. ह्या श्रीहरीच्या देवळाच्या पश्चिमेस त्या लोकांची मानमरातबाची ढालकाठी व बैठकीची जागा आहे. ते दरसाल श्रीकुणकेश्वराच्या यात्रेस आपल्या परिवारासह मोठ्या थाटानें जात असतात; व ह्या

आपल्या पूर्वजांच्या ढालकाठीस मान देतात. ज्याप्रमाणें नारिंग्रेकर राणेराव यांचा तेथें मानमर्तबा आहे, त्याप्रमाणें-च आचरेकर, साळसकर, जामसंडकर वगैरे मराठ्यांचे मान आहेत. ह्या मराठ्यांचे येथें मान असण्याचें हें कारण असावें कीं दक्षिण कोंकण हें सावंतवाडीकर सरदेसाई यांकडे पूर्वी चालत होतें, परंतु नंतर ह्या प्रांतीं बेबंदशाही झाल्यामुळें शिवाजीनें हा मुलूख काबीज करून येथें आपले सरदार प्रजा संरक्षणार्थ नेमिले होते. ते सर्व बलाढ्य असल्यामुळें लोक त्यांस फार भीत असत; व हजारों रुपये ह्या देवालयाप्रीत्यर्थ खर्च करीत असत. ह्या सरदारांनीं, तेथें गेल्यावर आपणांस बसण्याकरितां योग्य स्थळें असावीं ह्मणून वरील मानाच्या जागा केल्या असाव्या. हल्लीं कोंकणांत ह्यांचे वंशज आहेत, परंतु तेथील पांढरपेशा सावकारांनीं त्यांस जर्जर करून सोडिलें आहे. व काप जाऊन त्यांचीं भोंकें मात्र शिल्लक राहिलीं आहेत. असो. ह्या त्यांच्या मानमर्तबाच्या जागा अगदीं मोडकळीस आल्या आहेत. श्रीकुणकोबाच्या देवालयासन्निध एक नारिंग्रेकर यांची विहीर आहे, तिचें पाणी यात्रेकरू लोकांस पुरविण्यास जो खर्च लागतो तो तेंच अझून देत असतात.

देवळाच्या तटा बाहेर डावे बाजूस छोटें पण टुमदार व सुंदर असें एक तळें आहे. त्याचें क्षेत्रफळ सुमारें ३७५ चौरस हात आहे. याचें कामही फार सुरेख असून त्यांत उतर-

ण्यास मजेदार पायऱ्या केल्या आहेत. ह्या तळयास फार वर्षें झाल्यामुळें याचें कामही विसकटत चाललें आहे. यात्रेकरू लोक याचें पाणी तुरळक पितात. कारण वर्षांतून ह्यांत एक वेळां मात्र कायती वापर असल्यामुळें पाणी हवें तसें स्वच्छ रहात नाहीं. समुद्रस्नानास जाण्याकरितां जे घाट बांधिले आहेत तेही पहाण्यालायक आहेत. त्यांस फार खर्च झाला असावा असें त्यांच्या बांधकामावरून दिसून येतें. परंतु तेही बिचारे हल्लीं मोडकळीस आले आहेत.

श्रीकुणकेश्वराच्या पश्चिमेस समुद्राला लागून भल्या भक्कम दगडांचा एक दुहेरी तट आहे. त्यावर समुद्राच्या लाटा धडाधड आदळतात. ह्या लाटांच्या योगानें बाहेरील तट विसकटत चालला आहे, परंतु पोटतट कायम आहे. ह्या तटावर उभे राहिलें असतां घो घो वारा वहातो, व अंगावरील वस्त्रांचा खड खड असा आवाज होतो. संध्याकाळच्या वेळीं तेथें अमळ बसलें असतां सर्व संसारदुःखें विसरून मनुष्य क्षणभर आनंदसागरांत अगदीं गुंग होऊन जातो.

ह्या देवालयाच्या पूर्वेस झुळ झुळ वहाणारा असा एक गोड्या पाण्याचा ओहोळ आहे, त्यावर सुंदर दगडी पूल बांधून जाण्यायेण्यास सडक केली आहे.

वरील स्थळांशिवाय आणखीही पुष्कळ स्थळें येथें वर्णन करण्यासारखीं आहेत परंतु विस्तारभयास्तव तसें करितां येत नाहीं. याच देवालयाची हल्लींची अशी दैन्य स्थिति पाहून

सहृदय प्रेक्षकाच्या जिवास चटका लागून राहतो. असो. एकंदरीनें हें देऊळ पहाण्यालायक असून कसाही दुःखीकष्टी व संसारांगारतप्त मनुष्य तेथें गेला असतां त्यास जें समाधान होतें व मनाची जी एक प्रकारची तल्लीनवृत्ति होऊन जाते, तिचें वर्णन करणें कठीण आहे, त्याचा साक्षात् अनुभवच घेऊन पहावा.

---

## भाग २.

### यात्रा.

श्रीकुणकोबाची गडगंज यात्रा महाशिवरात्रीस भरत असते. ती माघ वद्य १३ पासून तों फाल्गुन वद्य २ पर्यंत असते. त्यावेळीं कोंकणपट्टीपैकीं बहुतेक भागांवरील लोक सुमारें ७,००० पर्यंत तेथें जमत असतात. ते सतत महायात्रेपर्यंत ह्मणजे तीन दिवस राहून नंतर आपला गाशा गुंडाळितात. जे कांहीं यात्रेकरू जवळपासच्या खेड्यांमधील असतात ते मात्र लौकर परत जात नाहींत.

कोंकणांत प्रत्येक गांवीं ग्राम्यदैवतांचीं छोटींनाटीं देवळें बरींच आहेत. ह्या देवळांचे जे पुजारी असतात त्यांस 'घाडी' अशी संज्ञा आहे. ह्या देवळांत काठ्या, किंवा तरंग असतात, त्यांस पितांबरानें किंवा लुगड्यांनीं नेसवितात. ज्यावेळीं गांवकऱ्यांस ह्या दैवतांची आराधना करण्याचा प्रसंग

वा.म.ग्र.

येतो, त्यावेळीं ते सदरील तरंग किंवा काठ्या घाडी यांच्या हातांत देऊन त्यांस धूप, दीप, नैवेद्य वगैरे दाखवितात. व त्या घाड्यांच्या आंगांत तीं दैवतें संचरावीं एतदर्थ ते वाद्यांचा खूब गजर करितात. नंतर त्यांच्या आंगांत तीं दैवतें आल्यावर त्यापुढें नारळ ठेऊन त्यांस भूत, भविष्य, वर्तमान वगैरे तोडगे विचारितात. ह्या बनविलेल्या देवांस 'अवसर' अशी संज्ञा आहे. ही चाल देशावर नाहीं.

तरंग, पालख्या, अबदागिरी, चौऱ्या वगैरे इतमामासह, कुडाळ, पाटण, साळस, व सौंदळमहाल व राजापूर तालुका यांतून या अवसरांच्या झुंडीच्या झुंडी येतात. हें क्षेत्र फार लांब पडल्यामुळें येथें उत्तर कोंकणांतील अवसर येत नाहींत. यात्रेकरू लोक मात्र येतात. सदरील अवसर येत असतां वाटेंत साळेभोळे लोक त्यांची पूजाअर्चा करितात; व त्यापुढें नारळ वगैरे ठेवून त्यांस तोडगे विचारितात. या प्रमाणें प्रत्येक लहान मोठ्या खेड्यांतील दैवतांच्या प्रतिमा ने अवसर ते मोठ्या थाटामाटानें श्रीकुणकोबाच्या भेटीस येत असतात. तेथें गेल्यावर प्रथमतः ते श्रीकुणकोबाचें दर्शन घेतात व नंतर दुसऱ्या कृत्यांस लागतात. एकंदरीनें ज्याप्रमाणें पंढरीस ज्ञानोबाची, तुकोबाची वगैरे पालख्या उत्साहास भिरवत येतात, त्याचप्रमाणें ह्या ग्राम्यदेवतांचीही स्थिति होय.

यासमयीं श्रीकुणकेश्वराच्या आसपास बऱ्याच अंतरापर्यंत

लोकांचे थवेच्याथवे नजरेस पडतात. समुद्रकांठीं वाळवंटावर एकच गर्दी होऊन जाते. स्त्रीपुरुषें चित्रविचित्र रंगांचीं वस्त्रें परिधान करून मोठ्या थाटमाटानें मिरवत असतात. तरूण व नूतन विवाहित जोडपीं एकमेकांच्या हातांत हात घालून, स्मितहास्य करून व लज्जायुक्त होत्सातीं समुद्रस्नान करितात. हा देखावा फारच अवर्णनीय दिसतो. त्या वाळवंटीं शेंकडो स्त्रिया आपल्या प्रिय भर्त्यांचा हात धरून लाटांसरशी बुडी मारितात, व तीं एकमेकांकडे सलज्जतेनें पाहून यथेच्छ जलस्नान करितात. ह्या वाळवंटीं घोंव्याइतक्या पाण्याच्या ठिकाणीं घरासारख्या लाटा धडाधड येऊन आदळतात. त्या लाटा आल्या कीं एकदम लोक खालीं बसतात व त्या खुशाल त्यांच्या डोक्यांवरून जातात.

महायात्रा भरत असते त्यावेळीं लोक आपल्या वडिलांचीं श्राद्धें वगैरे करीत असतात. व त्यांच्या अस्थि महासागरास अर्पण करितात. गरीब बिचाऱ्या रूपयौवनसंपन्न ब्राह्मणस्त्रिया ज्यांस अकालीं वैधव्य प्राप्त झालें आहे त्याही आपल्या सुंदरपणाचें मातेरें करण्याकरितां तेथें जमतात, व आपल्या सुंदर रूपड्यांचा येथेंच अंत झाला ह्मणून ओकसाबोकशीं हंबरडा फोडून आक्रोश करितात. हाय! हाय! तो ऐकून पाषाणहृदयी मनुष्याच्याही काळजास छेद पडतील, मग इतरांची काय कथा !!! तरूण विधवांचें वपन करण्याची चाल कीं-

कणस्थांत फार  ाहे, परंतु देशस्थ स्त्रियांस वृद्धापकाळीं जरी वैधव्य प्राप्त झालें तथापि त्या वपन करीत नाहींत. असो. येथें भटभिक्षुकांचीही बरीच पोळी पिकते. गरीब बिचाऱ्या शेतकऱ्यांस पूजाअर्चा करण्याचें वगैरे ज्ञान नसल्यामुळें अगदीं ग्राम्य व हाडाचें मात्र भिक्षुकांचे बोढहे ' दक्षिणाः पान्तु ' असें ह्मणून बराच पैसा त्यांपासून उपटितात.

येथें आसपासच्या झाडांझुडपांखालीं जिकडेतिकडे चुलीच चुली दृष्टीस पडतात. कित्येक तर देवदर्शनापेक्षां तीन दिवस वनभोजनांतच दंग झालेले असतात. जेवणाचा समय झाला ह्मणजे जिकडे तिकडे स्त्रीपुरुषें स्वयंपाकांत गुंतलेलीं दिसतात. स्वयंपाक वगैरे आटोपून जेव्हां हातातोंडाशीं गांठीं पडतात, तेव्हां तो देखावा मजेदार दिसतो. कोठें चपातीभात, कोठें खीरपुरी, कोठें चटणी भाकर, कोठें कांदाभाकर, कोठें नुसती शुभ्र तांदळांची गोड भाकर त्यास कालवण आहे आहे नाहीं नाहीं; हुलग्याची तांबडी उसळ, तांदुळजाची रानभाजी, आणि कुळीथांचें पातळसें कळण, वगैरे अल्पमोली पण बहुगुणी पदार्थांचा देखावा दृष्टीस पडतो. श्रीमंत लोकांचा पक्वान्नांवर सपाटा असतो व त्यांबरोबर त्यांच्या शागीर्द लोकांचीही चंगळ उडते.

श्रीकुणकेश्वराच्या देवालयांत शिरतांना मार्गांत जो बाजार लागतो त्यांत शेंकडो लोक ठोकळ किंवा किराणा जिन्नस घेण्यांत चूर झालेले आढळतात. व्यापारी लोक येथें लांब-

लांबून येतात व हजारों रुपयांची देवघेव करून व शेंकडों रुपये कमवून घरचा रस्ता सुधारितात. यांना ही जत्रा ह्मणजे केवळ पैसे मिळविण्याची मात्राच ह्मणावयाची.

---

## भाग ३.

### श्रीकुणकोबाची लोकप्रसिद्धि.

श्रीकुणकेश्वराविषयीं प्राचीन लेख क्वचित् आढळतो तथापि कांहीं ग्रंथाधारें व तेथील वृद्ध माणसें कांहीं त्याविषयींची हकीकत सांगतात ती माझ्या देशबंधूंस सादर करितों.

मराठ्यांची गादी स्थापणारा जो शिवाजी महाराज तो ह्या पृथ्वीवर अवतरण्यापूर्वी फार वर्षें देवगड तालुका उजाड होता. कोंकणपट्टींत मुसलमान बादशाहाचा अंमल असल्यामुळें जिकडे तिकडे बेबंदशाही व झोटिंग बादशाही होती. ' बळी तो कान पिळी ' हा न्याय सर्वत्र असल्यामुळें लोक त्रस्त होऊन कित्येक कुटुंबांनीं आपल्या जन्मभूमीस शेवटचा नमस्कार करून देशांतराची वाट धरली होती; त्यामुळें गांवचे गांव ओस पडून, भरवस्तीच्या जागेंत किर्र झाडी माजली होती. राघो भांगऱ्यासारखे जे लुटारू व वाटमारे लोक होते त्यांचें मात्र हें ठिकाण माहेरघर होऊन राहिलें होतें.

येथें हिंसक पशूंचें ओरडणें दिवसाढवळ्या ऐकूं येई. झुळ झुळ वहाणारे जिवंत ओढे खडकांतून खळ खळ असा

शब्द करून समुद्रास भेटण्याकरितां मोठ्या उत्कंठेनें जात. त्याचप्रमाणें ह्या रानांत हजारों पक्षांचीं कुटुंबें असून चारी प्रहर त्यांच्या किलकिलाटानें तें अरण्य कसें अगदीं गजबजून जाई. याप्रमाणें तेथें अरण्याची जी अवर्णनीय शोभा होती, ती आतां स्वप्नीं तरी दृष्टीस पडेल काय? आतां ह्या तालुक्यांत व कुणकोबाच्या आसपास वरील अरण्याची शोभा व झाडपेड नसून केवळ हा माळ बनून राहिला आहे. व असल्या नसल्या झाडांवर इंग्रजबहादरांचा खडा पहारा आहेच! येथें आतां पक्षांचें नांवच काढूं नका! बिचाऱ्यांची तेथील दुष्ट व अधाशी पारध्यांनीं चटणी उडविली, व ते पारधीही आतां हत्यारांच्या कायद्यामुळें हाका मारीत बसले आहेत. असो.

दुष्ट, अधम, बेवकूब व हिंदूंची टाळीमुळी खणून काढणारे जे म्लेंच्छ लोक, त्यांस योग्य शासन ह्या धाडशी हेटकऱ्यांच्या हातून करावें ह्मणून, किंवा जीं अनाथ कुटुंबें म्लेंच्छांच्या जाचामुळें धाय माय मोकलून रडत असत व निशिदिनीं ईश्वराचा धांवा करीत असत, अशा लोकांस योग्य मदत करण्याकरितां येथें श्रीकुणकोबानें अफाट समुद्रतीरीं आपलें स्वरूप प्रगट केलें. व हेटकऱ्यांच्या मनांत साहस, पराक्रम, उद्योग, देशाभिमान इत्याद्यनेक गुणांस जागा दिली ह्मणूनच सर्व आर्यभूमींतील लोकचसे काय, परंतु परद्वीपस्थ लोक जे टोपीवाले तेही या हेटकऱ्यांस फार

मांवाजीत होते. ज्या महापराक्रमी पुरुषानें हें हिंदूचें अफाट राज्य मिळविलें व जो यवन लोकांस पाण्यांत दिसत असे, असा जो शिवाजी महाराज, त्यानें ह्या हेटकरी लोकांच्याच साह्यानें हिंदूचें तक्त स्थापिलें व शेंकडों डोंगरी व भुईकोट किल्ले बांधिले. जे हेटकरी लोक मावळ्यांचे सख्खे बंधु, बंदुकीनें हटकून नेम मारावा असा यांनींच, कोंकणची जमीन बहुधा नादान, घाटाशीं खडकाळ, व समुद्रकांठाशीं रेताळ, याप्रमाणें पायांखालीं सखत जमीन, डोक्यांवर अनंत आकाश, परसांत अफाट समुद्र आणि अंगणांत उंच सह्याद्रि अशा काचांत ते होते, तशांत श्री कुणकोबाची त्यांच्या हृदयावर धाडस करण्याची पूर्ण प्रेरणा मग काय? त्यांनीं त्या सह्याद्रीच्या व समुद्राच्या पैलतीरीं भरारी मारून अटकेपर्यंत जयघोषाचा झेंडा लावून म्लेंच्छांची लाही लाही करून टाकिली.

आतां आपण श्री कुणकोबाकडे वळूं, व हें ठिकाण लोकप्रसिद्ध होण्यास काय कारण झालें तें पाहूं.

श्री कुणकेश्वराच्या देवालयापासून एक दोन मैलांच्या अंतरावर ‘मिठबाव’ ह्मणून समुद्रकांठीं एक लहान गांव आहे. त्याच्या जवळपास एक कर्मनिष्ठ ब्राह्मण मुलांलेकरांसहवर्तमान वास्तव्य करीत असे. तो ब्राह्मण गरीब होता व त्याच्या पदरीं मुलांबाळांचा राडा बराच असल्यामुळें तो आपला प्रपंच टुकुटुकु चालवीत असे. शेतकऱ्याचें प्रपंचाचें

मुख्य साधन कायतें गुरेंढोरें हें होय, हें तो पकें समजत असल्यामुळें त्यांविषयीं तो विशेष काळजी घेई. त्या गुरांच्या कळपामध्यें एक एकवर्णी काळीभोर गाय होती, तिच्यापासून ह्या ब्राह्मणास विपुल दूध मिळून त्याच्या लेकरांची चंगळ उडत असे. तो तीवर फार माया करी; तीस कोंवळा कोंवळा चारा दुरून आणावा, तीस नित्य धुवावें, व तीस घासून पुसून तिची पाठ थापटावी याप्रमाणें तिची तो नित्य काळजी घेई. त्याची स्त्री फारच सात्विक स्वभावाची व पातिव्रत्याची केवळ मूर्तीच अशी होती. ही केवळ कामधेनुच आहे असें समजून ती तिची पूजाअर्चा नित्य करीत असे.

एके दिवशीं ही गाय गुरांच्या कळपांतून चुकून दाट अरण्यात चालती झाली. पूर्वी येथें भयंकर अरण्य असल्यामुळें, लोकांस निजल्या जागीं हिंसक पशूंच्या किंकाळ्या ऐकूं येत. यावरून येथें जंगल भरवस्तीपासून नजीकच असावें असें अनुमान करितां येई. व एकदां काळोख झाला ह्मणजे घरांतून बाहेर पडण्यास कोणी धजत नसे. एखादें बिचारें गुरूं ह्या जंगलांत सांपडलें कीं हिंसक पशूंनीं त्याचा फडशा करून टाकिलाच! व एकदां तें दृष्टीआड झालें ह्मणजे त्याच्या धन्यास त्याची आशा सोडून द्यावी लाग. असो. ह्याप्रमाणें ही गाय दाट झाडींत गोफाटली व निबिड काळोख पडल्यामुळें घरचा मार्ग तीस सांपडेना.

सायंकाळीं नित्याप्रमाणें त्या गाईचा समाचार घेण्यास व

तिची धार काढण्यास तो ब्राह्मण तीस गुरांच्या कळपांत धुंडूं लागला. परंतु ती कोठें न आढळल्यामुळें त्याचें काळीज चूर झालें. जरी काळोख वगैरे पडून आजुबाजूच्या जंगलांत व्याघ्रादि हिंसक प्राण्यांचें ओरडणें चाललें होतें, तथापि जिवाचा धडा करून त्यानें आसपासच्या रानांत तिचा बराच शोध केला. परंतु सर्व व्यर्थ. आतां आपली प्रिय गोजी आपणांस खास अंतरली असें त्यास वाटलें. नंतर घरीं येऊन झालेलें सर्व वर्तमान त्यानें आपले प्रियेस सांगितलें व टपटप अश्रु ढाळिले. आपल्या पतीचें असें खेदयुक्त भाषण ऐकून तिचा कंठ दाटून आला; व आपल्या कुटुंबांतील एक रत्नच हारपलें असें जाणून ती ओकसाबोकशीं रडूं लागली. आपली आई रडते हें जाणून त्या ब्राह्मणाच्या चिमुकल्या बाळांनीं रडून रडून जो आकांत केला तेणेंकरून तें सर्व घर शोकाकुल होऊन गेलें.

ज्या ठिकाणीं ती गाय चुकली होती तेथें दाट झाडी असून ती जागा उंचवट्यावर होती. त्या झाडींत चार पांच वृक्ष अगदीं जवळ जवळ असून त्याच्या फांद्यांनीं केवळ ती पर्णकुटिकाच बनून राहिली आहे कीं काय, असा भास होई. ह्या जागेंत व आसपासच्या रानांत 'कुणकाचीं' झाडें फार होतीं, व तें रान त्यांनींच अगदीं व्यापून गेलें होतें; यामुळें तेथील आसपासचे गांवढेकरी लोक त्यास 'कुणकाचें रान' असें म्हणत. हीं झाडें हल्लीं श्रीकुणकेश्वराचा देवालयासन्निध

आहेत, व त्यांचा तेथील लोक औषधांसही उपयोग करितात. असो. त्या मानलेल्या पर्णकुटिकेलगत ती गाय उभी राहिली, परंतु जेव्हां व्याघ्रादि हिंसक पशूंचें ओरडणें तीस ऐकूं आलें, तेव्हां ती अगदीं गर्भगलित झाली. आतां आपणास ह्या पर्णकुटिकेशिवाय छपून रहाण्यास दुसरें स्थळ नाहीं असें जाणून ती त्यांत शिरली, परंतु आंत पाऊल टाकितांच तीस हिऱ्याच्या प्रकाशासारखा दगडाचा उजेड दिसला, व ती तो दगड जों न्याहाळून पहाते तों तें स्वयंभू शिवलिंग आहे असें तिच्या दृष्टीस पडलें. मनुष्यप्राण्याप्रमाणें पशुपक्षी आदिकरून प्राण्यांचीही ईश्वरावर निष्ठा आहे असें पुढील हकीकतीकरून वाटतें. असें सांगतात कीं, जेव्हां रात्रीं श्वापदें हिंडूं बागडूं लागत त्यावेळीं तीं सर्व प्रथम त्या लिंगाच्या दर्शनास येत असत. ही गाय लपून राहिली होती त्यावेळीं व्याघ्रादि हिंसक पशु त्या लिंगाच्या आसपास किंकाळ्या फोडूं लागले, त्यामुळें तर तिची पांचावर धारण बसली. व आतां आपला मृत्यु समीप आला असें तिनें जाणिलें. तीं जनावरें त्या लिंगाच्या अगदीं जवळ येत परंतु ह्या गाईकडे ढुंकूनही पहात नसत. याप्रमाणें तिनें ती सर्व रात्र मोठ्या संकटानें घालविली. सर्व रात्रभर ह्या लिंगानेंच आपणास संरक्षिलें असें जाणून तिनें त्याविषयीं फारच पूज्यभाव धरिला. व त्याविषयीं फारच प्रेमभरित होऊन आपल्या दुग्धाचा प्रेमयुक्त पान्हा त्या शिवलिंगावर सोडिला. दुसऱ्या दिवशीं उजाडतांच

ती निर्विघ्नपणें आपल्या धन्याच्या घरीं आली.

चुकलेलें मूल आईस सांपडलें असतां जसा तिला आनंद होतो, तसा त्या गाईस पहातांच त्या ब्राह्मणास व त्याच्या कुटुंबांतील सर्व माणसांस अत्यंत आनंद झाला. त्याचीं मुलें आनंदानें नाचूं लागलीं. ब्राह्मणपत्नीनें तीवरून लिंबलोण उतरिलें; व स्वहस्तें तीस दाणापाणी व चारा दिला. ह्याप्रमाणें त्या ब्राह्मणदंपत्याची मुखश्री आनंदानें प्रफुल्लित झाली. ब्राह्मण तिची धार काढण्यास जों जातो, तों कासेंत दूध नाहीं, हें पाहून त्यास आश्चर्य वाटलें, दुसऱ्या दिवशींही ब्राह्मण दूध काढण्यास गेला परंतु गाईनें पान्हा चोरल्यामुळें त्यावेळींही तो निराश झाला. ही गाय त्या दिवसापासून नित्य चरावयास सुटली ह्मणजे त्या लिंगाप्रत जाई व प्रेमपान्हा त्या लिंगावर सोडी, त्यामुळें ब्राह्मणास दूध मिळत नसे.

दाणा, पाणी, चारा, वगैरे भरपूर मिळत असून ही दूध कां देत नसावी? असा विचार त्यानें मनांत आणून तिच्या शोधावर असण्याचा निश्चय केला.

एके दिवशीं प्रातःकाळीं ब्राह्मणानें नित्याप्रमाणें सर्व गुरेंढोरें सोडिलीं; त्याबरोबर त्या गाईसही सोडिलें परंतु तीवर त्याचें पुरें लक्ष्य लागून राहिल्यामुळें, त्यानें तिच्यावरील आपला डोळा काढला नाहीं. ती गाय बंधमुक्त होतांच आनंदानें चोहोंपायांवर उड्या मारीत मारीत श्रीकुणकेश्वर स्थानाप्रत जाऊं लागली. हा ब्राह्मणही लपत छपत तिच्या पाठोपाठ

चालला. त्या गाईनें आपल्या जिवाकडे तिलमात्र लक्ष्य न देतां ज्याप्रमाणें आई आपलें प्रिय बालक फार दिवस भेटलें नसलें ह्मणजे मोठ्या उत्कंठेनें व त्वरेनें त्यास भेटण्याकरितां जाते, त्याप्रमाणें ही गाय ईश्वररूपी लेंकरास भेटण्याकरितां गेली. तिच्याबरोबर धांवतांना तो ब्राह्मण अगदीं बेदम झाला, परंतु करतो काय! उंच सखल नागा, कांटेकुटे, वगैरेंची पीडा सोसून ज्या ठिकाणीं ती गाय गेली होती तेथें कसामसा तो पोंहचला. तेथें गेल्यावर त्या ब्राह्मणानें तिचें पुढील कृत्य पाहिलें:—ती त्या झाडाच्या आळ्यांत गेली, तिनें त्या लिंगाकृतीस हुंगिलें, त्यास प्रदक्षिणा घातली, सर्वांग आकुंचित करून त्यापुढें लोटांगण घातलें, नानाप्रकारचे विलक्षण मानवी प्राण्याप्रमाणें हावभाव करून तद्विषयक आपली पूज्यबुद्धि प्रकट केली, डोळ्यांत आंसवें आणून त्या लिंगावर तीं टपटप ढाळिलीं व प्रेमभरित होऊन पान्हा ईश्वरावर सोडिला. तेणेंकरून तें सर्व लिंग दुग्धमय होऊन आसपासची जागा दुधानें भरून गेली. ह्या चतुष्पाद जनावराचा ईश्वराचे ठिकाणीं काय हा पूज्यभाव!! नाहीं तर आह्मीं मनुष्यें दांभिकपणाचा आव घालून बाहेरून लोकांस सोंगें दाखवितों.

**तुका ह्मणे सारीं सोंगें । दावी बाहेरील अंगें ॥**

ज्याची ईश्वरावर खरी श्रद्धा आहे तो मनुष्य देखत भुलीपणाची चट्टी पट्टी करीत नाहीं. अशा दांभिक भक्तांची फजीती आमच्या फक्कड कविरायानें एका लावणींत केली आहे:—

**काय गळ्यांत घालुनि तुळशींचीं लांकडें ॥**
**हीं काय भवाला दूर करतिल माकडें ॥**
**बाहेर मिरविशि बा आंत हरिशि वांकडें ॥**
**अशा भक्तिच्या रसा रहित तूं कसा ह्मणविशी बुधा ॥**
**हरिरस सांडुनि घेशी दुधा ॥ १ ॥**
**जाळ गळ्यांमधि माळ कशाला व्याळ काम कोपला ॥**
**आंतुनि बाहेर ह्मणविशी भला ॥**
**वित्त पहातां पित्त येतसे चित्त पाहिजे मला ॥**
**असें हरि ह्मणतो नुमजे तुला ॥**
**दांभिक वर संभावित अभ्यंतरीं नाहिंस बिंबला ॥**
**बहिर्मुख नर नरका लाधला ॥ २ ॥**

ब्राह्मण लोक केवळ आशेचें माहेरघर हें जगप्रसिद्ध आहेच. ह्या गाईचीं सर्व कृत्यें जरी भक्तिभावाचीं होतीं तथापि तीं पाहून त्यास मनस्वी संताप आला व तो ह्मणाला, मी या गाईचें पोटच्या पोराप्रमाणें जरी पालनपोषण

करीत आहे, तथापि तें विसरून ही दुष्ट व कृतघ्न गाय ह्या रानांतील एखाद्या अमंगळ दगडावर पूर्ण भाव ठेवून मन-मानेल तसें यास दूध पुरविते काय ? यासच जर आपण ये-थून नाहींसें केलें तर आपणास ही विपुल दूध देईल. असें मनांत आणून त्यानें तीस बरेंच बडविलें व त्या लिंगावर एक भली भक्कम शिळा आदळली. ती शिळा मारतांच त्या लिं-गाचें एक शकल उडालें व त्यांतून भळभळ रक्तस्राव होऊं लागला. हें नवलाचें कृत्य पाहून तो ब्राह्मण भयकंपित झाला; व ह्या दगडांत कांहीं तरी ईश्वरी अंश आहे असें त्यानें पूर्णपणें जाणिलें. मीं हें कृत्य अजाणतां केलें त्यावि-षयीं मला क्षमा असावी, ह्याप्रकारें त्यानें त्याची फारच स्तुति केली. तथापि रक्तस्राव बंद न रहातां पाण्याच्या झऱ्याप्र-माणें त्यांतून तो वाहूं लागून त्याचे पाट चालले. ब्राह्मण कर्मनिष्ठ व ईश्वरपरायण असल्यामुळें त्यानें असा कृतनि-श्चय केला कीं, जेव्हां हा रक्तस्राव बंद राहील तेव्हांच घरीं जाईन. असा त्याचा अढळ निश्चय पाहून भूमींतून अशी वाणी झाली कीं " जें शकल एका बाजूस उडून पडलें आहे तें पुन्हा जसेंच्या तसेंच त्याच ठिकाणीं लावावें. " हें ऐकून ब्राह्मणास फार आनंद झाला, व त्यानें तें शकल त्या

लिंगावर लावतांच रक्तस्राव बंद होऊन पूर्ववत् जसेंच्या तसेंच तें बेमालूम झालें; व केलेल्या कर्माचा पश्चात्ताप पावून त्या लिंगाची त्यानें स्तुति केली, व तो त्या गाईसहवर्तमान घरीं परतला.

घरीं आल्यावर झालेलें सर्व वर्तमान त्यानें आपल्या स्त्रियेस सांगितलें. ती स्त्रीही भर्त्याप्रमाणेंच ईश्वरपरायण असल्यामुळें त्या लिंगाच्या दर्शनास नित्य जाऊं लागली. ब्राह्मणानें ती गाय त्या लिंगास अर्पण केली व तो नित्य तिची पूजा अर्चा करूं लागला. पुढें ही सर्व हकीकत तेथील गांवकऱ्यांस समजली. त्यांनीं त्यावर पूर्ण भाव ठेविला, व तें लिंग कुणकाच्या अरण्यांत उद्भवलें ह्मणून ते त्यास "कुणकोबा देव" असें ह्मणूं लागले व त्यांनीं त्यावर एक लहान झोंपडी बांधिली. नंतर तेथें दिवाबत्ती लावणें, झाड सारवण करणें, पूजा अर्चा करणें वगैरेंच्या सेवेंत तें ब्राह्मणदंपत्य निमग्न झालें.

---

## भाग ४.

### देवालयाविषयीं प्राचीन माहिती.

हिंदुस्थान देश ह्मणजे संपत्तीचें केवळ माहेरघर, अशी कीर्ति ऐकून हजार बाराशें वर्षांपासून अरबस्थान, अफगाणि-

मराठी ... नं० ...

स्थान, तार्तरी, इराण, वगैरे देशांकडून मुसलमानांचें जणू पेंवच फुटलें होतें. पश्चिमेकडून व उत्तरेकडून त्यांच्या झुंडीच्या झुंडी दीन दीन करीत हिंदुस्थानांत शिरल्या; व त्यांनीं दिल्लीस बादशाही तक्त स्थापिलें आणि आपलें पोतडें भरण्यासाठीं हळू हळू सर्व हिंदुस्थानभर त्यांनीं सर्व प्रकारची धामधूम चालविली. ह्याचवेळीं कोंकणपट्टींतही त्यांनीं आपला शिरकाव केला.

सोळाव्या शतकांत हिंदुस्थानांत सोन्याचा धूर निघत असतो ह्मणून एशिया, युरोप वगैरे खंडांत डंका वाजला होता, त्यामुळें तेथील व्यापाऱ्यांचीं जहाजें हिंदुस्थानाच्या किनाऱ्यावर आदळूं लागलीं. हे व्यापारी लोक खेळणी, चिनई सामान, बिलोरी सामान वगैरे अल्पमोली व कुचकामी चिजा येथें आणीत, व त्यांचा क्रयविक्रय करून अगणित द्रव्य गोळा करून स्वदेशीं परत जात, ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहेच.

असें सांगतात कीं, ब्रह्मदेशांतील कोणी हाजी नांवाचा म्लेंच्छ व्यापारी गडगंज द्रव्यानें एक मोठें जहाज भरून अरबी समुद्रांतून स्वदेशीं परत जात असतां वादळाच्या सपाऱ्यांत सांपडला. त्या गलबतानें आपली गति सोडून वाऱ्याचे व लाटांचे स्वाधीन होऊन आपला रोंख थेट पूर्वेकडे वळविला. ह्या भ-

यंकर वादळापासून आतां आपली सुटका खास होत नाहीं व आपण सर्व ह्या महासागरास बळी पडतों ह्याविषयीं सर्वांनीं मनांत गांठ बांधिली. डोंगरासारख्या लाटा धाडधाड गलब-तावर आदळूं लागल्या, समुद्र फार उंचबळून त्याच्या लाटा आदळून तो सर्व फेंसमय होऊन गेला. इतकें झालें त-थापि तें तारूं मजबूद असल्यामुळें पाण्याचा ठिपकाही आंत आला नाहीं, परंतु सोसाट्याचा वारा येऊन एकदांचें जें शीड उभारिलें होतें त्याचा विजेच्या गडगडाटा सारखा आवाज होऊ-न त्याचे तुकडे तुकडे झाले. मग मात्र त्यांच्या तोंडचें पाणी पळालें, व त्यांस 'दे माय धरणी ठाय' असें झालें. आपण सर्व आतां घटके अर्ध घटकेचे सोबती असें सर्वांस वाटून ते एकमेकांस शेवटची मिठी मारून खळखळां रडूं लागले, व आतां पुढें तारणोपाय काय करावा याविषयीं कोणास कांहींच सुचेना. प्रत्येक मनुष्याला 'सबसे जीव प्यारा' होय. मग त्यास कोणतीही उपाधि असो. त्या गलबतावर कित्येक संसारत्रस्त लोक होते, परंतु संसारांत कितीही जरी निकृष्टावस्था अस-ली तथापि ज्याची त्याची कुडी त्यास प्रिय आहेच. याविषयीं आमचे रंगेल कविराय ह्मणतात:—

रांडेला बुगडी, न बांड लुगडीं, हातीं नसे बांगडी ।

पांळें ना दगडी, तसाच रगडी, बाळें खुळें लंगडीं।
शेला ना पगडी, तसाचहि गडी, ना फाटकी घोंगडी।
चिंतेची सगडी, मनीं धडधडी, पै गोड वाटे कुडी॥१॥

अशी स्थिति जर अगदीं कायाहीन, द्रव्यहीन, व निराश्रित जनांची आहे, तर मग श्रीमंत लोक आपल्या जिवास किती बरें मौल्यवान् मानीत असतील, याची कल्पना वाचकांनींच करावी.

त्या गलबताचा धनी जो 'हाजी' नामक व्यापारी होता त्याजवळ अगणित द्रव्य असून त्याचा कोट्यावधि रुपयांचा व्यापार चालत असे. आपलीं शंभर वर्षें भरलीं, असें जेव्हां त्यास वाटलें, तेव्हां आपली सर्व संपत्ति, संतती, वैभव व हा अकालिक मृत्यु हें सर्व त्याच्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभें राहिलें. तो अति शोक करून छाती बडवून घेऊं लागला व या दुर्घट प्रसंगांतून आपली सुटका व्हावी एतदर्थ त्यानें आपल्या दैवताची अनन्यभावेंकरून आराधना केली. परंतु सर्व व्यर्थ? समुद्र अधिकाधिक उचंबळून पूर्वींपेक्षां फारच मोठ्या लाटा गलबतावर आदळूं लागून आंत पाणी येऊं लागलें; तेणेंकरून गलबताच्या पृष्ठभागावर पाण्याचीं डबकें सांचलीं.

मनुष्यास एखादें मोठें संकट प्राप्त झालें ह्मणजे त्याच्या

बुद्धीस भ्रंश होऊन तो सारासार विचार करीत नाहीं. आपण कितीही स्वधर्मपालक असलों, व इंग्रजी वैद्यांच्या हातचें औषध घेण्यास कितीही नाकें मुरडलीं, तथापि जेव्हां आपला अंतकाळ समीप आला असें आपणांस वाटतें, त्यावेळीं धर्माधर्माकडे दुर्लक्ष करून प्राण वांचविण्याची कसलीही अमंगळ चीज असली तरी तिचा किळस न मानितां ती ग्रहण करितों; त्याप्रमाणें ह्या व्यापाऱ्याची स्थिति झाली. आतां आपल्या आयुष्याची घटका भरत आली, व आपल्या नांवाजलेल्या दैवतांस प्रार्थना करितां करितां हात टेकीस आले, आतां हिंदूंच्या देवतांस शरण जावें ह्मणजे तीं तरी ह्या संकटापासून आपली सुटका करितील असें मनांत आणून त्यानें स्तुति केली ती अशी:–

**देव दयामय, करूं मे विनय। अर्पणा अभय, मुझे सांब ॥१॥**
**करू हूं भजन, करूं हूं स्तवन। करूं हुं नमन, तुमको में॥२॥**
**तुम हो दयाल, करो प्रतिपाल। अज्ञान हुं बाल, शरण में ॥३॥**
**तुम माय बाप, हरो सर्व ताप। करो सर्व माफ, पाप मेरा ॥४॥**

याप्रमाणें त्यानें त्याचा धांवा केला व असें ह्मणाला हे, प्रभो, मला या दुर्घट संकटापासून सोडीव ह्मणजे हा दास जरी मूळचा अन्यधर्मी आहे व आजपर्यंत त्याच धर्मावर श्रद्धा

ठेवून वाढला आहे, तथापि तो आपल्या धर्मास तुच्छ मानून तुझ्या सेवेंत तत्पर राहील.

ही त्याची प्रार्थना आटोपल्यावर काय चमत्कार झाला पहा, वारा बंद पडला, समुद्र शांत झाला व जीं कांहीं छोटीं नाटीं शिडें त्या गलबतावर अवशिष्ट होतीं तेणेंकरून तें गलबत घोंगावत चाललें. तीन चार तासांच्या आंतच त्यांस पूर्वेकडे एक लांब पर्वतांची रांग क्षितिजाजवळ दिसली हें पाहून सर्व लोकांनीं आनंदाच्या आरोळ्या मारिल्या. सायंकाळीं दिवस पाण्यांत पडतांच ते त्या पर्वताच्या ओळीशीं येऊन थडकले. ही पर्वताची ओळ सह्याद्रीची होती, हें आमच्या भूगोलज्ञ वाचकांस माहीतच असेल. असो. याप्रमाणें ते सर्व सुखरूपपणें समुद्रकांठाशीं येऊन पोंहचले. सर्वांस आपला पुनर्जन्म झाला ह्मणून जो आनंद झाला त्यामुळें त्यांनीं ईश्वराचे फारच आभार मानिले व त्याची नानाप्रकारें स्तुति केली.

रात्रीचा समय असल्यामुळें आपण कोणत्या देशांत येऊन थडकलों हें त्यांस कांहींच समजलें नाहीं. परंतु अमळशानें जेव्हां त्या मुख्य व्यापाऱ्यानें चोहोंकडे दृष्टि फेंकली, तेव्हां नजीकच एका उंचवट्यावर त्यास एक दिवा दृष्टीस पडला त्यावरून तेथें मनुष्यांची वस्ती नजीकच असावी असें त्यास

चाटून त्यानें चौकशीकरितां तिकडे आपलीं मनुष्यें धाडिलीं. तीं डोंगरावर चढून पहातात तों तेथें एक लहानशी खोपटी असून त्यांत तांब्राची पिंडी आहे व तेथें एक दिवा टिकी टिकी नळत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें व आजुबाजूस कोणी चिट पांखरूंही नसून क्षुद्र प्राण्यांचें व हिंसक पशूंचें ओरडणें मात्र ऐकूं येत आहे, असें पाहून ते भयभीत झाले व झालेलें सर्व वर्तमान त्यांनीं आपल्या धन्यास येऊन सांगितलें. हे त्यांच्या तोंडचे शब्द ऐकून तो व्यापारी तत्क्षणीं त्या स्थानाप्रत गेला. ह्याच देवानें आपणांस या दुर्घट संकटापासून सोडविलें असें त्यास पक्केपणीं वाटलें. व त्यावर पूर्ण भाव ठेवून त्याच्या सेवेंत तो निमग्न झाला व तेव्हांपासून त्याच्या म्लेंच्छ देवतांचा त्यास तिटकारा आला व त्यानें ह्या कुणकोबावर टोलेजंग देऊळ बांधण्याचा दृढनिश्चय केला. असो.

हें देऊळ बांधण्यास त्यास महत्प्रयास पडले. ही कोंकणपट्टी पूर्वीं मुसलमानी अमलामध्यें असल्यामुळें, तेथें तेच लोक राज्यकर्ते होते. व ते हिंदुभजनालयद्वेष्टे असल्यामुळें, हिंदूंचीं असलीं नसलीं देवालयें लुटून, फोडून, जाळून ते त्याचा फडशा करीत; तेव्हां नूतन बांधण्यास ते कोठून सामिल होणार ! तशांत स्वधर्मी मनुष्य आपल्या धर्माविरुद्ध

हिंदूंच्या देवाचें देऊळ बांधितो, हें ऐकून तर त्यांच्या तळ-पायांची आग मस्तकांत जाऊन भडकली; व ते देऊळ बांधण्यास त्यास कांहीं केल्या परवानगी देईनात. ह्या व्यापाऱ्यानें आपली सर्व निष्ठा कुणकोबावर ठेवून असा निश्चय केला कीं माझी सर्व संपत्ति पालथी घालीन परंतु देऊळ बांधल्याविना कधींही रहाणार नाहीं. पैसा ही एक अमोल्य चीज आहे तेणेंकरून ह्या पृथ्वींत पाहिजे तशी उलाढाल करितां येते. त्या व्यापाऱ्यानें तेथील ती जमीन विकत घेण्यास त्या हट्टी बादशाहास फारच द्रव्य दिलें; तेव्हां त्यानें एकदांची परवानगी दिली. ठीकच आहे. " द्रव्येण सर्वेवशा: " या न्यायानें कशाचें तोंड मोकळें केल्यावर मग कशाची उणीव पडणार आहे? त्या व्यापाऱ्यानें त्याशिवाय ती जमीन इमारतीलायक करण्यास अतोनात पैसा खर्ची घातला, व हल्लींचें देऊळ बांधून सर्वानुमतें त्याचें नांव ' श्रीकुणकेश्वर ' असें ठेविलें. ह्यासच ह्मणावें औदार्य. कित्येक लोक असें सांगतात कीं यानें आपल्या स्वधर्मी लोकांच्या आग्रहानें ह्या देवळाची धर्ती मशीदीच्या आकाराची बांधण्यास प्रारंभ केला होता. परंतु बिचारा करतो काय? ते भाग व तत्संबंधी मनोरे सटासट ढांसळून खालीं पडत.

कांहीं केल्या ती इमारत ह्मणून वर चढेना. तेव्हां ह्यांत कांहीं तरी गूढ असावें असें जाणून त्यानें हल्लींप्रमाणें देऊळ बांधिलें. मुसलमानानें हिंदुदेवालय बांधल्याचा हा प्रथमच मासला होय.

ह्या धार्मिक व लोकोत्तर व्यापाऱ्यानें आपली सर्व निष्ठा श्री कुणकेश्वरावर ठेविली. त्यानें आपल्या मशीदींत निमाज पढण्याचें वर्ज केलें, त्याची आपल्या धर्मावरील श्रद्धा जाऊन हिंदुधर्मावर जडली, त्याचे जातभाई त्यास नास्तिक ह्मणूं लागले. कित्येक तर त्याचें जीवित हरण करण्याचे तयारींत राहिले, व हंबी तुंबीचसे काय परंतु कैक वेळां हातघाईवर येऊन बेतली. परंतु सर्व व्यर्थ. तो सर्वसाक्षी श्री कुणकेश्वर त्याचा पाठराखा असतां त्या सव्वाहात दाढीच्या मुसंड्यांचें काय चालणार आहे ?

पुढें कांहीं दिवसांनीं तो सात्विक व्यापारी सृष्टिक्रमानुसार परलोकीं सुखानुभव घेण्यास गेला. ह्याच्या मृत्यूचा सन व त्याचें कारण बरोबर सांपडत नाहीं. तेथील कित्येक मुसलमानांच्या सांगण्यांत असें आहे कीं, त्यानें हिंदुदेवालय बांधिल्यामुळें त्यास कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन देवळाच्या उंच मनोऱ्यावरून खालीं उडी टाकून प्राण दिला. व कित्येक हिंदुलोकांच्या सांगण्यांत असें आहे कीं, त्यानें समाधिस्थ होऊन देह-

त्याग केला. पहिलें कारण सयुक्तिक ह्मणावें तर हल्लीं जी त्याची तेथें मशीद व कबर आहे, ती तेथें असती ना. कारण असें असतें तर त्याचे जातभाई त्याचें थडगें आपल्या कबरस्थानांत बांधिते; आतां दुसरें कारण मात्र कांहीं अंशीं सयुक्तिक दिसतें, कारण तो ईश्वरपरायण असल्यामुळें, व त्याचा सर्व भाव श्री कुणकेश्वरावर जडल्यामुळें त्यानें आपल्या देहाची तेथेंच समाधि घेतली व आपण जीवंत असतां हल्लींची कबर बांधाविली. अशाच प्रकारच्या दुसऱ्या पुष्कळ इतिहासप्रसिद्ध गोष्टी आहेत. अबु पहाडावर जें 'बनलशहा' व्यापाऱ्यानें प्रचंड देऊळ बांधिलें आहे त्याचीही तेथें अशीच समाधि आहे.

स्वहिताला लाथ मारून जगतावर उपकार करण्या प्रीत्यर्थ ज्यानें आपला देह झिजविला त्या महंताची महती येथें किती वर्णन करावी? तो जरी अन्यधर्मी मनुष्य होता तरी आमच्या धर्मावर त्याची किती श्रद्धा होती? त्यानें ह्या देवालयाचें प्रचंड काम अतोनात संकटें आलीं तरी तीं कसूपटासमान मानून देवापुढें आपल्या संपत्तीचे ढीग घातले, व आह्मा हिंदुधर्मपरायण ह्मणविणाऱ्यांस माना खालीं घालण्यास लाविलें. तेथील राज्यकर्ता जरी ह्या व्यापाऱ्याच्या

हात धुऊन पाठीस लागला होता तथापि त्यानें त्यास मर्कटा-समान मानून आपला निश्चय अढळ ठेविला कीं, मी हा माझा देह श्रीकुणकोबास अर्पण केला आहे. आतां मला कोणी भजोत, भाजोत, बाणांचे प्रहार करोत, वार करोत, हात तोडोत, पाय मोडोत, पाहिजे तें करोत; परंतु जोंपर्यंत ह्मणून ह्या कुडींत जीव आहे तोंपर्यंत हा ह्या कुणकोबाच्या सार्थकीं लावीन.

ह्यासच ह्मणावें निश्चय; नाहीं तर आह्मीं सकाळीं निश्चय करितों व जेवणा नंतर त्यास ढेंकराबरोबर हुश हुश करून सोडितों. धिक्कार असो त्या आमच्या निश्चयास! अशा डळ-मळित निश्चयानें आमच्या हातून कोणतेंही काम तडीस जाणार नाहीं. व कोणताही अढळ निश्चय केल्याविना आह्मी कीर्तीस पात्र होणार नाहीं. दृढनिश्चयाविषयीं भर्तृहरीनें एके ठिकाणीं ह्मटलें आहे.

" विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः ।
प्रारब्ध मुत्तमजना न परित्यजंति ॥ "

ह्मणजे कामास आरंभ केल्यावर त्यास कितीही विघ्नें आलीं तरी जे न डगमगतां तें तडीस नेतात त्यांसच उत्तम प्रतीचे मनुष्य ह्मणावें. याकरितां आह्मी दृढनिश्चय करून आपल्या

मागें आपलें नांव जगांत राहील असें कांहीं तरी सत्कृत्य करण्याचा विडा उचलावा. कबीर ह्मणतो—

मूरतसे कीरत बडी बीन पंख उड जाय,
मूरत तो जाती रही कीरत कभी न जाय "

---

## भाग ५.

### अन्य प्रांतांतील देवालयें व प्रवास.

अन्य प्रांतांत हिंदुदेवालयाची कशी स्थिति असते हें माझ्या प्रिय देशबांधवांस समजण्याकरितां जो मीं तेथें जाऊन शोध केला आहे त्याविषयीं व तत्संबंधी माझ्या प्रवासाविषयीं तांत्रिक माहिती खालीं या भागांत दिली आहे.

आह्मी राजपुताना रेलवे सुरू होण्यापूर्वी अमदाबादेपासून तों थेट अजमिरापर्यंत खुष्कीनें प्रवास केला. अमदाबादेपासून सुमारें ६० मैलांवर सिद्धपूर ह्मणून मातृगयेचें क्षेत्र आहे. हा गांव बडोदें संस्थानांत मोडतो. येथें देवालयें ह्मणण्यासारखीं नाहींत. मात्र येथें जी सरस्वती नदी आहे तीस लोक ती कुमारिका ( समुद्रास न मिळाल्या कारणानें ) आहे असें मानून पूज्य मानितात. ह्या नदीस नाशिकांतील गंगेप्रमाणें घांट वगैरे बांधिलेले नाहींत. गांवांत गुजराथी ब्राह्मणांची वस्ती दाट

आहे. ते आपण 'गंगापुत्र' आहोंत असें मानितात. हे लोक फार गलिच्छ आहेत. गांवांतील स्त्रीपुरुषें ह्याच नदीचें पाणी पितात. ह्या नदीला चैत्र वैशाखीं घोंट्या इतकें पाणी असतें. येथें कपिल महामुनीच्या आश्रमाची जागा आहे. तेथें तीन कुंडें व कनिष्ट प्रतीचीं पडकीं देवळें पांच सहा आहेत. तेथें भाविक लोक श्राद्ध करितात, तेणेंकरून माता स्वर्गास जातात अशी त्यांची समजूत आहे. या ठिकाणीं पहाण्यासारखें दुसरें कांहीं नाहीं.

पुढें तेथून सुमारें वीस मैलांवर पालनपूर गांव लागतो. येथें पालनपूरचा नबाब रहातो. ह्या गांवासभोंवतीं मजबूत कोट आहे. ह्या कोटा सन्निध एक विहीर आहे. तेथें एक तळी आहे त्यांत गुर्जरस्त्रिया निर्लज्जतेनें दिवसाढवळ्या खुशाल जलविहार करितात. येथेंही पाहण्यालायक विशेष कांहीं नाहीं.

पालनपुरापासून पुढें मारवाड प्रांताची छाया दिसूं लागते. ह्या गांवापासून आठ मैलांवर चित्रासनी ह्मणून नदी आहे तिचा उगम एका शिवलिंगापासून झाला आहे. तेंही लिंग आह्मीं पाहिलें. सकृद्दर्शनीं पहाणाऱ्यास तें लिंग दिसत नाहीं, परंतु पाण्यांत चांचपल्यावर हातास लिंगाकृति लागते. ही नदी खडकांतून झुळझुळ वहात जाऊन पुढें

बरीच मोठी झाली आहे. या नदींत पुष्कळ मोठेमोठे मासे आहेत. ते मनुष्यास अगदीं भीत नाहींत. याचें कारण हेंच असावें कीं त्यांस तेथें आमच्या कोंकणाप्रमाणें कोणी खाणारे शत्रु नाहींत. अरवली पर्वतांची रांग येथून सुरू होते व दोहीं बाजूंनीं पर्वतांचीं गगनचुंबित शिखरें दृष्टीस पडूं लागतात. व पुढें जसजसा रस्ता काटावा तसतशी किर्र्र झाडी लागते. ह्या रानांत हिंसक पशूंचें ओरडणें दिवसाढवळ्या ऐकूं येतें. सर्व जातींचीं श्वापदें दिवसा देखील हें आपलें घरच आहे असें समजून खुशाल इकडे तिकडे हिंडतात. ह्या जंगलाची शोभा फारच अवर्णनीय आहे. अहाहा!! परमेश्वराची करणी किती रमणीय आहे? हें केवळ अरण्य असूनही किती रमणीय दिसतें? दोन बाजूंस गगनचुंबित पहाड असल्यामुळें, त्यांत शेंकडों नद्या उत्पन्न झाल्या आहेत; व त्या फार दूरवर फैलावून अनेक देशांत पीक होऊन तेथील लोक सुख पावत आहेत. हें अरण्य कोट्यावधि प्राण्यांस अन्न व आश्रय पुरवितें. हें अनंत वनस्पतींनीं भरलें आहे. त्याच्या योगानें तेथील प्राण्यांस रोगबाधा मुळींच होत नसेल. हें सगळें खरें, परंतु ह्याच अरण्यांत दुष्ट, अघाशी, कृतघ्न, व अधम अशी एक मनुष्यांची जात आहे, ती कोणती ह्मणाल तर "भिल्ल लोकांची." हे लोक किर्र्र झाडींत आपलीं झों-

पडीं बांधून वाटसरांचा प्राण घेतात व असलें नसलें त्यांपासून हरण करितात. जितके दुर्गुण ह्मणून ह्या पृथ्वींत भरले आहेत ते सर्व ह्यांचे ठायीं पूर्णपणें वसत आहेत. महापूर, विद्युल्लता, धरणीकंप, चंडवात, ज्वालामुखी ह्यांचाही एक वेळ ह्या जगास चांगला उपयोग होईल; परंतु ह्या पाषाणहृदयांचा काडीमात्रही उपयोग होणार नाहीं !! हल्लीं राजपुताना रेल्वे सुरू झाल्यापासून वरील प्रकार घडत नाहींत व पूर्वींप्रमाणें अरण्याची शोभाही आतां नाहीं.

पुढें तेथून आठ मैलांवर अबूचा पहाड लागतो. ह्या पर्वताचा घेर सुमारें ५० मैलांचा आहे. याचें फार उंच जें शिखर आहे त्यास 'गुरुशिखर' असें ह्मणतात. तें समुद्राच्या सपाटीपासून ५६०० फूट उंच आहे. ह्या टापूवर हवा व पाणी फारच सुंदर असून नानाप्रकारच्या सुगंधी फुलांचे ताटवेच्या ताटवे लागून गेले आहेत. चैत्र वैशाख हे दोन महिने जरी कडक उन्हाळ्याचे आहेत तथापि ह्या पहाडावर दिवसा आंगावरील पांघरूण काढवत नाहीं. हिंदुस्थानांत उष्णकाळांत पारा बहुतकरून ९०° अंशांवर असतो परंतु तेथें त्याच समयीं ६९° अंशांपेक्षां जास्त कधींही असत नाहीं. हें हिंदुलोकांचें पवित्र स्थान आहे. ह्या

पर्वतावर चढतांना नागमोडीसारखे रस्ते लागतात. याचे मध्यभागीं 'दिलवारा' नामक देवस्थान आहे. यांत चार देवळें असून याची रचना सोंगट्याच्या पटाप्रमाणें केली आहे. यांत मुख्य जें देवालय आहे तें 'रीच' देवाचें आहे. याचें वर्णन टॉड् साहेबांनीं आपल्या ग्रंथांत फारच मनोवेधक केलें आहे, त्यांतील एक वेंचा पुढें घेतला आहे तो–"आग्रा येथील ताजमहाल शिवाय करून यासारखें नाजुक, सुरेख, भव्य व हस्तकौशल्यांत तारीफ करण्यासारखें असें सर्व पृथ्वींत एकही काम नाहीं. बाकीच्या सर्व इमारती याचे पुढें तुच्छ होत." आह्मीं तें देऊळ पाहिलें त्यावरून वरील लेख अक्षरश: खरा आहे अशी आमची खात्री झाली. व दुसरें, अनेक तऱ्हेचें नक्षीचें काम पाहून कारागिरांच्या अलौकिक हस्तकौशल्याची तारीफ केल्याविना रहावतच नाहीं. हें देऊळ पट्टन येथील बनलशहा नांवाच्या व्यापाऱ्यानें बांधिलें आहे व यास अतोनात पैसा खर्च लागला आहे. शिरोहीच्या राजापासून हा टापू विकत घेण्याकरितां जमिनीवर एकसारखे रुपये आंथरून ती जागा व्यापाऱ्यास विकत घ्यावी लागली. व जमीन इमारतीलायक करण्यास छप्पन्न लक्ष रुपये खर्च झाला. व देवालयाचें बांधकाम करण्यास

याशिवाय अठरा कोट रुपये लागले ते वेगळेच. हें काम चौदा वर्षें चाललें होतें. काय हा पैसा ! व काय हें औदार्य !! नाहीं तर आह्मांस गरीब निराश्रितांस मूठभर दाणे देण्यासही नाकींनव येतात ! असो.

पालनपुरापासून तों थेट ऐरणपुरापर्यंत झाडीच झाडी लागून गेली आहे. ह्या झाडींत हजार पांचशें लोकांच्या वस्तीचीं गांवें बरींच आहेत. हे लोक नावाजलेल्या देशांतील लोकांसारखे सुशिक्षित नाहींत. परंतु हे ईश्वरपरायण फार आहेत, असें तेथील देवालयांवरून दृष्टोत्पत्तीस येतें. जरी गांवांत ह्मणण्यासारखा एकही वाडा दृष्टीस पडावयाचा नाहीं, तथापि उंच शिखरांचीं पांढरीं धोप व भव्य देवालयें तुह्मांस प्रत्येक गांवीं सांपडतील; व त्या गांवच्या दैन्य स्थितीमुळें तुह्मांस तीं प्रचंड पण रेखलेलीं देवालयें पाहून मोठें आश्चर्य वाटल्यावांचून खचीत रहाणार नाहीं. हीं देवालयें त्यांनीं एका जुटीनें बांधिलीं आहेत. हे लोक केवळ श्रीमंत आहेत असें नाहीं. परंतु ईश्वरावर त्यांची पूर्ण श्रद्धा असल्यामुळें अशा प्रकारच्या इमारती बांधणें हेंच आपलें कर्तव्यकर्म होय, असें मानून ते झटून अशीं कामें करितात.

वरील प्रकारच्या देवालयांचें काम ते याप्रमाणें शेवटास

नेतातः—तेथें स्फटिक दगडांच्या कांहीं खाणी सांपडतात, त्यांतील दगड नीट नेटके करून उंटावर लादून आणितात, त्यांत चुनखडे मिळवितात, त्यांच्या भट्ट्या लावितात, इमारतींचीं लांकडें तेथें क्वचित् सांपडतात ह्मणून मोठमोठ्या रुंद व संगमरवरी दगडांच्या खांबांची त्यांच्या ठिकाणीं योजना करितात, त्याचप्रमाणें विटेसारख्या ठिसूळ पण तेजस्वी दगडांनीं त्यांच्या भिंती बांधितात. त्यांवर सर्व कृष्णलीलेचीं खुबीदार पण नाजुक अशीं नानातऱ्हेचीं चित्रें रेखितात, त्या भिंती रंगी बेरंगी करितात, त्यांच्या गाभाऱ्यामध्यें कृष्णवर्ण मूर्ती स्थापितात. त्यांत पाय निसटून मनुष्य पडण्यासारख्या गुळगुळीत, व तेलासारख्या तुळतुळीत स्फटिक दगडांची योजना करितात, त्यास दरवाजे ठेंगणें करून त्यांचीं झडपें नकशीदार पण मजबूद बसवितात, गाभाऱ्यांत वारा खेळावा ह्मणून दगडांच्या जाळीदार खिडक्या लावितात. एकंदरीनें ह्या देवळांची बांधणी पाहून त्या लोकांचें चातुर्य आमच्या इंजीनियरिंग कॉलेजच्या यंत्रांतून पडलेल्या जाड्या विद्वानांपेक्षां खचित् अधिक होय असें ह्मणावें लागतें.

आम्हीं दक्षिणमहाराष्ट्रांत वरील प्रमाणेंच प्रवास केला व थेट विजापुरापर्यंत मुलूख पाहिला. हा कर्नाटकांतील प्रवास

दुष्टासही न घडो !!! आम्हीं गेलों ते चैत्र वैशाखीचे दिवस ! ऊन्ह तर बोलूंच नका ! वाफेच्या लाटा येऊन त्या आमच्या अंगावर आदळत ! त्यामुळें सर्वांगाची कशी लाही लाही उडे. तेथील जमीन काळी भोर, ती तापली ह्मणजे तिचा रंग बदलून ती इंगळाप्रमाणें लाल होई; तेथें कोस कोस पर्यंत औषधासही घालावयास पाणी मिळावयाचें नाहीं, मग प्यावयास कोठून मिळणार ! झाडाचें हिरवेंगार पान स्वप्नांतही दृष्टीस पडणें कठीण ! निवाऱ्याचे जागेविषयीं तर नांवच काढूं नका! आम्हीं भिमानदी ओलांडली, व तिचें पात्र पाऊण मैल आहे; परंतु तिच्या पाण्याची खळाळी एके बाजूस लागून त्यांत पुरें आमचें पाऊलही भिजलें नाहीं. गांव पहावें तर ओसाड व शुद्ध घुवडांचीं घरटीं बनून राहिलेले. घरें पहावीं तर केवळ कोंबड्यांचे घूड, ना छप्पर ना कौल ! लोक पहावे तर कोळशांतील माणिक ! मात्र त्यांचे डोळे काजव्याप्रमाणें झिग्झिगत. त्याप्रमाणें स्त्रियांचेंही अवर्णनीय स्वरूप त्यांस पाहिल्याबरोबर पुढील श्लोकाचें स्मरण होतें:—

शेळीचें पुच्छ वेणी, कुच दिसत असे, भाजलीं दोन वांगीं ।
डोळे पुष्पें रुईचीं, द्युति बहु मिरवे कोळशांचींच अंगें ॥
शोभा शाखा मृगाची धरि मुख, चिकणी नाक जीचें सुपारी ।

बांधा जीचा मृदंगापरि युवति अशी होय कोणास प्यारी॥१॥
मुद्गल जोशी.

गांवांत देऊळ ना राऊळ; एकाद्या भल्या भक्कम दगडाला धडा दोन धडे शेंदूर फांसलेला, तेंच काय तें त्यांचें दैवत. आमच्यासारखा तेथें नवखा गेला तर त्यांची भाषा न आल्यामुळें त्या बिचाऱ्याची फजीतीच उडून जावयाची व उपाशी मरावयाची पाळी यावयाची. पोट दाखवावें तेव्हां मात्र दोन जोंधळ्याच्या भाकरी अंगावर झुगारून देतात. व दुडू कुडू ( पैसा दे ) असें बोलतात.

कर्नाटक प्रांतांत जरी हिंदूंची पुष्कळ वस्ती आहे, तथापि मारवाड प्रांतांतील एकाद्या खेड्यांत जितकीं व ज्या थाटमाटाचीं देवळें सांपडतील तितकीं कर्नाटकांतल्या एकाद्या मोठ्या शहरींही सांपडणें कठीण. याचें कारण ते लोक असें सांगतात कीं, विजापूरच्या बादशाहानें हिंदूंचीं देवळें लुटून, फोडून, जाळून व फुंकून टाकिलीं, यामुळें हा प्रकार दृष्टीस पडतो.

नंतर आह्मीं विजापूर शहर पाहिलें. त्या जुनाट बादशाही शहराची रचना व तेथील इमारतींची अवर्णनीय शोभा पाहून जरी आह्मीं प्रखर उन्हा तान्हांतून प्रवास केला होता तरी

आमची तहान भूक निवाली. गोलघुमट, आसार महाल, जुमामशीद, चिनी महाल, आरसेमहाल, रंगमहाल, आनंदमहाल, गगनमहाल, उपली बुरूज, मलिक मैदान नांवाची तोफ, वगैरे पुष्कळ भव्य व अवर्णनीय इमारती वगैरे आह्मीं पाहिल्या. अहाहा !!! काय त्यांची शोभा ! काय तें बांधकाम ! त्यांची अंतर्बाह्य शोभा तोंडानें कितीही सांगितली, लेखणीनें कितीही लिहिली, व कलमानें कितीही रेखटली तरी तृप्ति होणार नाहीं ! ती स्वतां पाहिलीच पाहिजे.

तेथें किल्ल्यांत जो चिनी महाल आहे त्याविषयीं तेथील लोक असें सांगतात कीं, बादशाहाच्या वेळीं त्या महालापुढें शेंकडों हत्ती रोज झुलत असत, पागेंत हजारों घोडे हिंसत असत, जामदारखान्यांत जरतार, कलाबतू व किनखाब पुष्कळ झळकत होता. शिलेखान्यांत बल्लम, इटे, बंदुका, तलवारी वगैरे उत्तम प्रतींचीं हजारों हत्यारें चमकत होतीं. जवाहिरखान्यांत जडजवाहिराच्या पेट्यांच्या पेट्या गच्च एकाशीं एक खेंचून भरल्या होत्या. परंतु काय चमत्कार पहा ! तोच महाल पहावयास आह्मी जेव्हां आंत गेलों, तेव्हां कांहीं निराळाच प्रकार आमच्या पहाण्यांत आला. "गीरकायांचीं दोन टारगीं पोरें त्या जामदारखान्यांत कुदळी, पहारा व नव्या जुन्या लोखंडी

पाच्या वगैरे अमूल्य जिनसांचा एक दोन कारकुनांसह हिशोब ठिसोब ठेवीत होतीं."

सदरीं दर्शविलेले अन्यदेशांतील इमारतींचें व देवळांचें बांधकाम अजून बऱ्याच चांगल्या स्थितींत आहे. आमच्या कोंकणांतील श्रीकुणकोबाची जशी हल्लीं दैन्य स्थिति झाली आहे, तशी तेथें झालेली तुह्मांस क्वचित्च आढळेल. कारण तेथील लोक ईश्वरपरायण असल्यामुळें जुनाट कामें डळमळूं देत नाहींत. वरचेवर त्यांची दुरुस्ती करितात, तेणेंकरून तीं आतांच बांधिलीं आहेत काय असा भास नवख्यास होतो. आमच्या कोंकणपट्टींतील लोकांसारखी जाखाई, जोखाई, विठाई, पावनाई वगैरे अमंगळ देवतांवर या लोकांची श्रद्धा नाहीं, ह्मणूनच ते देश सुपीक, तेथें पाणी विपुळ, दूधदुभत्याची चंगळ, अशा समृद्धीनें भरून चालले आहेत.

---

## भाग ६.

### जीर्णोद्धाराविषयीं कांहीं विचार.

हाजी व्यापाऱ्यास देऊळ बांधण्याच्या संबंधानें किती महत्संकटें प्राप्त झालीं हें चौथ्या भागांत कळविलेंच आहे. हा व्यापारी परलोकवासी झाल्यावर मुसलमानांनीं एकदांचा आ-

पला डाव साधिला. श्रीकुणकेश्वराचें देवालय लुटून व त्याच्या कांहीं भिंती ढांसळून, त्याच्या बहुतेक भागाची त्यांनीं दुर्दशा उडविली. नंतर कोणी चिमाजी अण्णाजी नामक ईश्वरपरायण सद्गृहस्थ होऊन गेले त्यांनीं सुमारें शके १६१५ या सालीं त्याचा जीर्णोद्धार केला. ह्या पुरुषाचा वृत्तांत कोठें नीटसा सांपडत नाहीं. शिवाजीच्या व त्याप्रमाणें-च पेशव्यांच्याही कारकीर्दींत ह्या देवास बरेंच वर्षासन नेमून दिलेलें होतें. परंतु आपल्या दयाळू इंग्रज बहादरांनीं त्याच्या ढहाळ्या मुळ्या छाटीत छाटीत हल्लीं तें सालिना अवघें नव्वद रुपयांवर आणून ठेविलें आहे ! श्रीकुणकोबापासून एक दोन मैलांवर समुद्रकांठीं 'मुंत्ररी' नामक एक रेताळ खेडें आहे त्यांत एका मुसलमानाचें कुटुंब आहे. हा मुसलमान हाजी व्यापाऱ्याच्या कबरेची देखरेख करीत असे व त्या प्रीत्यर्थ त्यास सालिना पंधरा रुपये सरकारांतून मिळत असत. तेही पांच सात वर्षांखालीं आमच्या दयाळू सरकारानें बंद करून टाकिले. त्यामुळें हल्लीं त्या कबरेकडे कोणी ढुंकून सुद्धां पाहिनासें झालें आहे. जर त्या कबरेकडे कोणी लौकर लक्ष्य न पुरविलें तर ती लौकरच आपल्या धन्यास गाऱ्हाणें सांगण्यास परलोकीं जाईलसी वाटतें.

ह्या देवालयाचा जीर्णोद्धार करण्यास व त्याची पूर्वस्थिति त्यास आणण्यास आज सुमारें एक लक्ष रुपये लागतील. ही एवढी जबर रक्कम ह्या भिकार कोंकणांत गोळा कशी होणार? कोंकणपट्टींतील लोक बारा महिने जिवापाड मेहनत करितात परंतु त्यांस धड पोटभर भाकरही मिळत नाहीं. कोंकणांत जिकडे नजर फेंकावी तिकडे खडकांशीं गांठ, घरचा जो रोठा निघतो, त्याची दे घे खालींच चटणी उडते. जमिनीची जिवापलीकडे मेहनत मशागत करावी तेव्हां नाचण्या, वऱ्यांसारखें रूक्ष धान्य, तें देखील पांच चार महिन्यांच्या बेगमी पुरतेंच उत्पन्न होतें; ह्मणूनच कोंकणचे लोक उद्योग व सहास करून देशांतरावर आपले उदरनिर्वाहाचे धंदे करितात; व कवडी कवडी सांचवून माया जोडितात.

उत्तर कोंकणच्या उत्तर टोंकापासून तों तहत दक्षिण कोंकणच्या दक्षिण टोंकापर्यंत सर्वच लोक श्रीकुणकेश्वरास पूज्य मानितात असें नाहीं. तशांत आमच्या नवीन विद्वानांचें श्रीकुणकोबावरचसें काय, परंतु इतर सर्व दैवतांवर जें कांहीं प्रेम आहे तें पुसूंच नका! मग ते हिंदुदेवालयाची ऊर्जितदशा आणण्यास सहजच नाकें मुरडतील. हाडांचीं काडें करून इंग्रजी वर्णमाळेंतील दोनचार अक्षरांच्या पदव्या पटकाविल्या कीं आपल्या

जन्माचें सार्थक्य झालें असें त्यांस वाटूं लागलें आहे. पूर्वी आमच्या देशबांधवांनीं अतोनात पैसा व अक्कल खर्च करून ज्या श्रीकुणकोबासारख्या इमारती बांधिल्या आहेत त्यांकडे आमच्या कित्येक नवशिक्या व नांवाजलेल्या विद्वानांचें लक्ष्य मुळींच जात नाहीं. ह्यांनीं जर अशीं कामें मनावर घेतलीं तर ते तीं केव्हांच तडीस नेऊं शकतील. कारण त्यांचें वजन सरकारदरबारांत व राजेरजवाड्यांत जेवढें आहे तेवढें अक्षरशून्य व ग्राम्य गांवढळांचें नाहीं. ज्या लोकांची आपल्या धर्मावर पूर्ण श्रद्धा आहे त्यांस अशा देवालयांचा जीर्णोद्धार करणें उचित होय, हें जरी समजतें तथापि ते अडाणी असल्यामुळें, जगास आपले गहन विचार प्रगट करण्याचें त्यांस सामर्थ्य नसतें. बरोबरच आहे; कीं ज्यांस हातापायांच्या वीस बोटांपेक्षां जास्त अंक माहीत नाहींत त्या बिचाऱ्यांस शंभर, हजार, लाख, एवढी रकम कोठून ठाऊक ! ह्या लोकांनीं एखाद्या बड्या कामदाराची विनवणी केली व आप्पासाहेब, रावसाहेब वगैरे मोठया अदबीचीं नांवें घेऊन त्यांचीं पायधरणी केली तथापि हे विद्वान् व द्रव्यवान् वेटे त्यांस क्षुल्लक मानून त्यांचा धिक्कार करितात. हे आंग्लविद्याभूषित पंडित जन्मास आल्यापासून आमच्या देशाची व विशेषतः धर्माची

राखरांगोळी करीत चालले आहेत, व त्यांपैकीं कित्येकांस तर असें वाटूं लागलें आहे कीं, ह्या आर्यभूमिवर जीं पूर्वीच्या बेङगळ लोकांनीं अशीं हीं देवालयें वगैरे बांधून ठेविलीं आहेत त्यांचा शेवट होऊन, त्यांच्या ठिकाणीं मुसलमानांच्या मशीदी प्रमाणें ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज किंवा, कॉथोलिक्, प्रॉटेस्टंट वगैरे येशू भजनालयें, ह्या हिंदुस्थानभर केव्हां होऊन आह्मांस बूट, स्टॉकिंग, ट्रॉवझर वगैरे मानाच्या ड्रेसासह त्यांत गुडघे टेंकण्याचा प्रसंग येईल तोच सुदीन व हिंदुस्थानच्या खऱ्या सुधारणेचा प्रथम दिवस समजावयाचा " असो. तुका ह्मणे उगें रहावें, जें जें होइल तें तें पहावें "

आतां आपण शिरोलेखित विषयाच्या विचाराकडे वळूं.

ज्या लोकांच्या मनांत श्रीकुणकोबानें प्रेरणा केली असेल अशा लोकांनीं मुख्य मुख्य गांवीं सभा भरवाव्या व सभासदांनीं कुणकोबाची दैन्य स्थिति लोकांस कळवावी; व ज्या ज्या लोकांच्या मनांत त्याविषयीं पूज्यभाव झाला असेल त्यांनीं आपलीं नांवें व फंडाची रक्कम त्या गांवांतील सभेस कळवावी. ह्या वरील सभांनीं एका भरभराटीच्या गांवीं एक मुख्य सभा स्थापावी; व तींत विद्या, बुद्धि, परोपकार, उद्योग, व सत्य इत्याद्यनेकगुणसंपन्न लोकांची निवडणूक करावी. हे वरील

सर्व गुण एकाचेच ठायीं असण्याचा संभव कमी, परंतु त्यांचा सळमिसळ आहे असे लोक पुष्कळ सांपडतील. ह्या सभेंत जर श्रीमंत असूनही वरील गुणसंपन्न लोक सभासद असले तर फार बरें; कारण त्यांचें वजन लोकांवर इतर गरीब सभासदांपेक्षां साहाजिक फार असतें. यदाकदाचित् ह्या सभेंत जर श्रीमान् लोक सभासद होण्यास न धजले, तर आपण गरिबांनींच ह्या कामास कंबर बांधावी. "प्रयत्नीं परमेश्वर" हें वाक्य ध्यानांत धरून ती खचूं देऊं नये. सभेंतील ठळक व योग्य माणसांस खजिनदार व चिटणीस नेमावें. एकंदरीनें ज्याप्रमाणें हल्लीं अनेक सत्कृत्या संबंधानें फंड वगैरे करितां सभा भरवितात, व कमेट्या वगैरे नेमितात त्याप्रमाणेंच याही सभेची व्यवस्था ठेवावी ह्मणजे झालें.

मुख्य सभेनें आपले विचार, ठावठिकाण व सभासदांचीं नांवें वगैरे माहिती जगन्मान्य पत्रांतून प्रसिद्ध करावी व त्याचप्रमाणें ज्या ज्या लोकांकडून अथवा पोटसभेकडून पैसा गोळा होईल त्यांचीं नांवें व रकमेची पोंच वर्तमानपत्रद्वारें प्रसिद्ध करीत जावी, ह्मणजे लोकांस बरें वाटून मुख्य सभेची बढती दिवसानुदिवस अधिक होत जाईल.

याप्रमाणें पैसा गोळा होईल तो मुंबईच्यांकेसारख्या

एकाद्या विनधास्त ठिकाणीं श्रीकुणकोबाच्या नांवावर ठेवावा, ह्मणजे लोकांस ह्या सभेसंबंधीं तिळमात्रही संशय येणार नाहीं. श्रीकुणकोबाच्या जीर्णोद्धारास जितक्या पैशाचा अंदाज केला असेल ती सर्व रकम गोळा होईपर्यंत मुख्य सभेनें वाट पहात राहूं नये; कारण, अंदाज केलेली रकम थोडक्याच काळांत गोळा होईल असें सांगतां येत नाहीं. तशांत दिवसानुदिवस ह्या कामाकडे दुर्लक्ष्य केलें तर पुढें देवालयाची अधिकाधिक नुकसानी होत जाईल. आणखी हें काम लौकर सुरू न केलें तर लोकांस पैशा संबंधीं संशय येण्याची भीति आहे. याकरितां जसजसा पैसा गोळा होईल तसतसें अगदीं मोडकळीस आलेल्या कामाच्या दुरुस्तीची सुरवात करण्यास आरंभ करावा.

मुख्य सभेनें शिपाई, प्यादे वगैरे ठेवण्यासंबंधानें उगीच फाजील खर्च करण्याचे भरीस पडूं नये. मात्र लिहिण्याचें व पोटसभा वगैरेंशीं पत्रव्यवहार ठेवण्याचें काम फारच वाढल्यास एक अगदीं हलक्या पगाराचा कारकून नेमावा.

मुख्य सभेनें मोठमोठे राजेलोक, जहागिरदार, सरदार लोक मोठमोठे हुद्देदार व बडेलोक यांस हस्तें परहस्तें किंवा वर्तमानपत्रद्वारें आपला उद्देश कळवावा; व त्यांची या कामांत योग्य

मदत मागावी. व आपला जो जो कांहीं उद्देश लोकांस कळविणें आहे तो तो मुख्य सभेनें वर्तमानपत्रद्वारें कळवावा. ह्मणजे तीं वर्तमानपत्रें आपल्या अमूल्य पत्रीं तुमचा मजकूर मुफत आनंदानें घेतील, व ते या संबंधानें आपले विचारही कळवितील. तेणेंकरून कुणकोबाचें काम जरी बाऊ वाटण्यासारखें आहे असें आरंभीं तुह्मांस दिसतें तथापि तें निर्विघ्नपणें सहजीं शेवटास जाईल.

मीं हे जे विचार वरतीं ( या भागांत ) दर्शविले आहेत ते ह्मणजे सर्वथैव ह्या कामास लागू पडतीलच किंवा सर्वथैव त्याप्रमाणेंच व्यवस्था ठेवावी असें माझें ह्मणणें मुळींच नाहीं. परंतु बहुमतें जे जे विचार ठरतील व ज्याप्रमाणें फंडाची वगैरे व्यवस्था करण्याचें लोकांस सोयीवार पडेल, ते मुख्य सभेनें अमलांत आणावें.

कदाचित् कित्येक दीडशहाणे व साहसभीरु गृहस्थ प्रारंभीं या कामाच्या आड येतील, व सभासदांसही बुद्धिभेद करतील, परंतु त्यांनीं त्याकडे लक्ष्य पुरवूं नये. त्यांनीं आपल्या मनांत असा विचार करावा कीं " कुत्र्याला कस्तुरीचा गुण काय ठाऊक ? कां कीं तिचा स्वाद त्याला स्वतांसच कळत नाहीं व इतरांनीं स्वाद घेतलेला समजण्याची

ह्याला शक्तिही नाहीं, तेव्हां ह्याजकडे याचा काय बोल;" असें जाणून धरलेल्या कामास हात टेंकूं नयेत.

श्रीमंत व हुद्देदार लोक जर ह्या सत्कृत्यास हात घालतील तर हें बाऊ वाटण्यासारखें काम चटदिशीं तडीस जाणार आहे. यद्याकदाचित् त्यांस भिकेचे डोहळे आठवले तर आपण गरिबांनीं तरी धीर सोडूं नये. "धीरसो गंभीर" हें जाणून ह्या कृत्यास कंबर बांधावी, व कोणीही मनुष्यानें हें मोठें काम माझ्या एकट्याच्या हातून काय होणार आहे असें रें रें करीत बसूं नये. प्रत्येकानें* 'दसकी लकडी एकका बोजा' हा न्याय लक्षांत ठेवावा. जोंधळ्याच्या एका कणसांत फार तर पसाभर धान्य असतें, पण अशा पसा पसा धान्याची जमवाजमव केली तर राशीच्या राशी पडतात. तसेंच प्रत्येक जणानें जर श्रीकुणकेश्वराची ऊर्जितदशा आणण्याचें मनावर

---

* टीप—या वाक्याच्या सत्यतेकरितां लांब जाण्याचें कारण नाहीं; आमचा हाच निबंध छापून प्रसिद्ध करण्याच्या कामीं येथील गिरणींतील पांच मास्तर लोक ( रा. रा. लक्ष्मण भिकाजी काटे, रा. लक्ष्मणराव शिव सावंत, रा. अर्जुन बापूजी परब, रा. भाकु जिवाजी तळेकर, व रा. तुकाराम भोंडीबा ) यांनीं द्रव्यद्वारा कांहीं मदत केली तेणेंकरून हा निबंध जगापुढें मांडण्यास उमेद आली. यांच्या या सत्कृत्याचा इतरांनीं कित्ता घेण्यासारखा आहे.

घेतलें तर तें सहजीं शेवटास जाणार आहे. हें लक्षांत आणून प्रत्येकानें दृढनिश्चय धरावा. “ निश्चयाचें बळ, तुका ह्मणें तेंची फळ ” या वाक्यावर आपला पुरा अंमल बसवावा आणि श्रीकुणकेश्वराच्या दैन्य स्थितीकडे पाहून मान खालीं घालावी; व त्याच्या जीर्णोद्धारास पुरी कंबर बांधावी.

---

## भाग ७.

### देशबांधवांस उद्देशून दोन शब्द.

येथपर्यंत श्रीकुणकेश्वराचें माहात्म्य व तज्जीर्णोद्धारासंबंधीं कांहीं अल्प स्वल्प विचार प्रगट केले, आतां शेवटीं माझ्या देशबांधवांस दोन गोष्टी सांगून हा लेख पुरा करितों.

हें देवस्थान कोंकणपट्टींत फारच जुनाट असून तसेंच पूज्यही आहे. आपली ह्या देवावर फार श्रद्धा आहे असें दक्षिण कोंकणांतीलचसे काय पण इतर ठिकाणचेही लोक मानितात, परंतु हें सर्व मानणें तितक्यापुरतेंच आहे असें दिसतें. कारण खरोखर जर त्यांच्या हृदयांत त्या देवाविषयीं कळकळ असती तर ते त्याच्या जीर्णोद्धाराविषयीं कांहीं ना कांहीं तरी उपाय करिते. विचारी व सहृदय मनुष्य त्याची हल्लींची निकृष्टावस्था पाहील तर त्यास खेद वाटल्यावांचून

कदापि रहाणार नाहीं. काय तो विस्तृत सभामंडप! काय ते मुंगसाल! काय ते जंगी धक्के! काय ती सुरेख फरसबंदी! काय ते सुंदर घाट! परंतु हाय हाय! ह्या सर्वांची आतां राखरांगोळी किहो होत चालली आहे! तरी त्यांची दया ह्या यात्रेकरूंस व तेथील लोकांस कशी येत नाहीं! हे दांभिकांचे बेटे पाषाणहृदयी समजले पाहिजेत. लोकांस पोकळ आविर्भाव दाखविण्याकरितां तेथें नानातऱ्हेचीं सोंगें घेऊन जातात, देवाच्या नांवावर जत्रेच्या निमित्तानें मजा मारितात, यात्रा करण्यास मोठ्या थाटमाटानें निघून वाटेंतच पुष्कळ पैसा खर्च करितात; इतकेंच नव्हे पण तेथें तीन चार दिवस राहून वनभोजनादिकांतही पुष्कळ पैसा खर्च करितात; परंतु या पैशाचा उपयोग चिरकालिक असा कांहीं तरी होतो काय? तर बाबांनो, असें करूं नका. यात्रेकरितां ह्मणून दरसाल इतका पैसा जो तुह्मी खर्च करितां त्यापैकीं चतुर्थांश पैसा जरी खुद्द देवालयाच्या जीर्णोद्धाराच्या संबंधानें काढून व्यवस्थापक मंडळीच्या स्वाधीन कराल तर सहजीं किती मोठी रकम जमा होणार आहे बरें?

हे माझे प्रिय बांधवहो, तुह्मांस जर श्रीकुणकोबाच्या देवालयाच्या जीर्णोद्धाराचें काम हातीं घेण्यास किळस येत असेल

तर जे तुह्मीं हल्लीं कोंकणांतचसे काय, परंतु देशांतरावर त्याच्या नांवानें उदरनिर्वाहाचे धंदे करितां, त्या कुणकोबास आतां अगदीं विसरा! साधारण एखाद्या माळावरील दगडाप्रमाणें त्यास माना! त्याच्या वार्षिक उत्साहावर पाणी सोडा! त्याचे गुणानुवाद लोंचटाप्रमाणें परक्यापुढें नका गात बसूं! त्याविषयीं दांभिकपणा जगास नका दाखवूं! आमच्या कोंकणपट्टींत प्रणतवत्सल, दीनदयाल श्रीकुणकेश्वर अवतरला आहे असा जगभर नका दांडोरा पिटवूं! त्याचें हल्लीं जें देऊळ अगदीं मोडकळीस आलें आहे, तें अगदीं धुळीस मिळवा कसें! व जी कांहीं त्यास सरकारांतून देणगी मिळत आहे ती सरकारतिजोरींत परत जमा होईल असें करा! समुद्रांतून त्याचा जो अवर्णनीय देखावा दिसतो तो एकदांची जा विसरून! जाखाई, जोखाई, तारकाई, यमाई, तुकाई वगैरे जीं तुमचीं किळस येणारीं व पूज्य दैवतें त्यांस बकरीं, कोंबडीं वगैरेंचे नैवेद्य धर्माकडे लक्ष न पुरवितां अर्पण करा! ह्मणजे तरी ह्या देहाचें सार्थक्य केलें असें तुह्मांस वाटेल! व मेल्यानंतर "नरकवास" जें पापाचें राज्य तें तुह्मांस अखंड प्राप्त होईल असें करा!

ह्या वरील बुद्धिभेदानें तुह्मांस माझा तिटकारा येईलच प-

रंतु तुमची श्रीकुणकेश्वराच्या देवालयाविषयींची ही हेळसांड पाहून सदरील विचार मुद्दाम प्रगट करणें भाग पडलें.

माझ्या कित्येक मित्रांनीं मला असें सांगितलें कीं, श्रीकुणकेश्वराच्या जीर्णोद्धाराचें काम श्रीमंत, नावाजलेले, व सरकारांतून ज्यांचा बहुमान होत आहे अशा लोकांनीं हातीं घेतलें ह्मणजे तें चट्‌दिशीं शेवटास जाईल; हें त्यांचें ह्मणणें खरें आहे. परंतु वायफळ पांडित्य सोडून देऊन खरें देशकल्याण करणें हा मंत्र त्यांपैकीं थोडक्यांसच माहीत असतो; व जरी असला तरी ते डोळ्यांवरून कातडें ओढून घेतात; गरीब व देशकल्याणहितेच्छु लोक केविलवाणीं तोंडें वेंगाडून ह्या अशा गोष्टी त्यांस सांगण्यास गेले तर कित्येकांच्या डोक्यांत पित्त चढतें. "थोर ते चोर" अशी जी आमच्यांत ह्मण आहे ती सर्वथैव खोटी नव्हे त्यांच्या मागें हरएक प्रकारचीं कुलंगडीं असतात. व त्यांच्या डोळ्यांवर द्रव्याचा धूर असल्यामुळें अशा सत्कृत्याच्या छंदांत ते क्वचित्‌च पडतात. हे लक्ष्मीचे औरस पुत्र नाच, बैठकांमध्येंच दंग झालेले असतात व रात्रंदिन इष्काच्या नादीं पूर्ण गडप होऊन विषयलंपट झाले असल्यामुळें अष्टौप्रहर माशुक पांखरें ह्यांच्या डोळ्यांपुढें भरारी मारीत असतात. "सुंदरा मनामधें भरली, जरा

**नाहीं ठरली, हवेलित शिरली** " वगैरे विषय रात्रंदिवस त्यांच्या मनांत घोळत असतात; तर बाबांनो, ते अशा सत्कृत्याच्याकामीं कसे बरें मदत करतील? कारण त्यांस कामेच्छा तृप्त करण्यास मूठ मूठ रुपये खर्चावे लागतात जर ते आपले पैसे सत्कृत्याच्या कामीं लावतील तर त्यांणीं आपली वरील मनीषा कशी पुरवावी ? परंतु माझे प्रिय बांधवहो, त्यांनीं हें पंतवचन पक्कें लक्षांत ठेवावें "**हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं**" याप्रमाणें अंतकाळीं त्यांचे हाल कुत्रेंही खाणार नाहीं.

वरतीं श्रीमान् लोकांसंबंधानें जो मजकूर कळविला आहे त्याप्रमाणें सर्वांचीच वागणूक असते असें नाहीं, परंतु पुष्कळांची असते.

शेवटीं माझी आमच्या श्रीमंतमंडळास हात जोडून हीच विनंति आहे कीं, आपणांस मोठमोठे साधुसंत व महान् महान् कवि सांगत आले व सांगतात कीं, मोठमोठीं राष्ट्रें, राज्यें, हवेल्या, कुटुंबें, व धनराशि कालचक्राखालीं पिचून गेल्या तेथें आपला काय पाड ! संसार व संपत्ति ही दोनप्रहरची क्षणिक सावली आहे, ती केव्हां पाठमोरी वळेल याचा नियम सांगतां येत नाहीं. जी आपली सुंदर भा-

र्या व जीस आपण " सकलललितयुवतिजनशिरोभूषण अशेषगुणगणैकराशि " असें सव्वा हात लांब विशेषण देतों व जीबरोबर नानातऱ्हेचे विलास भोगून जिचें प्राणापलीकडे रक्षण करितों, ती आपली प्रिया "**जोंवरी पैसा तोंवरी बैसा मंचकिं ह्मणेल ध्याल हवा**" (रामजोशी.) या वचनाप्रमाणें एकदां संपत्ति पाठमोरी झाली ह्मणजे आपणास कस्पटा समान मानून आपला धिक्कार करील. आपणास वृद्धावस्था प्राप्त झाली ह्मणजे आपली संपत्ति आपल्या स्वाधीन असते असें नाहीं; तिचे भोक्ते आपले पुत्र होतात. व आपली वृद्धदशा आपणांस सर्वथैव त्याच्या स्वाधीन करिते. मग हाडांचीं काडें करून जें द्रव्य संपादन केलें असतें त्यांतील एका तांब्याच्या छत्रपतीसही मुलांच्या हुकुमाशिवाय हात लावतां येत नाहीं. पुत्रादिकांस अधिकोत्तर बोललों तर रामजोशांच्या पुढील लावणीप्रमाणें प्रकार घडतो:—

**वृद्धपणामधें पुत्रादिक तुज ह्मणतिलरे निबरा ॥**
**आणिकहि वाचसील कुठवर करुनि जनाच्या किती कबरा॥**
**तुझ्या सुना तुज ह्मणतील मेल्या म्हाताऱ्या लुबरा ॥**
**उगाच पड खाटेवर तुजला कशास व्हाव्या या खबरा ॥**

याकरितां जोंवर आपण पुत्रादिकांच्या स्वाधीन झालें

नाहीं व जोंपर्यंत आपली काठी आपणांस वाट दाखवूं लागली नाहीं, तोंपर्यंत दंड ठोकून सत्कृत्यें करण्यास उभें रहावें. हें सर्व क्षणिक व अशाश्वत आहे असा विचार करून, ताठा, गर्व, मीपणा, सोडून द्यावा. या जगांत परमेश्वरानें एकास एक वर्म करून ठेविलें आहे 'शेरास सव्वाशेर' जिकडे तिकडे आहेतच, मग रिकामा गर्वाचा फुंगा कां धरावा? आपले सभोंवतीं लोक जसे रोज मरत आहेत तसेंच आपणांसही हा भवपसारा येथचा येथेंच ठेवून एक दिवस मरावयाचें आहे हें पक्कें मनांत वागवा.

*यद्ददासि विशिष्टेभ्यो । यच्चाश्नासि दिने दिने ॥
तत्ते वित्तमहं मन्ये । शेषं कस्यापि रक्षसि ॥ १ ॥

हें सर्व कद्रुमंडळानें पूर्णपणें लक्षांत वागवावें व श्रीकुणकेश्वरासारख्या सत्कृत्यास कायवाचामनें झटावें म्हणजे त्यांस इहपरलोकीं सुखप्रद होईल.

हे माझे कोंकणपट्टींतील प्रिय देशबांधवहो, या भरतखंडांत जे हिंदुधर्माभिमानी राजेरजवाडे व सरदार वगैरे

* तूं सत्पात्रीं दान केलास तो पैसा, व स्वतःच्या निर्वाहाकडे खर्च केलास तो पैसा, एवढामात्र तुझा, बाकीचा तूं जो जीवापाड जतन करून ठेवितोस तो कोणाचा तरी.

लोक आहेत; त्यांस श्रीकुणकोनासंबंधाचें गाऱ्हाणें कळवा! ते झोंपेंत असल्यास त्यांस जागें करा! ह्मणजे ते तुमच्या श्रीकुणकोनास साह्य करतीलच करतील हें पक्कें लक्षांत ठेवा! तुह्मीं जरी श्रीमंतांच्या नांवानें हाका मारितां तथापि सर्वच तुमचा अपमान करण्यासारखे नाहींत. कोणाच्याही मुखीं तो श्रीकुणकेश्वर राहील व आपलें काम उरकून घेईल. मात्र तुह्मीं ह्या कामीं मेहनत घेतली पाहिजे. उगाच तोंडानें लांब लांब गप्पा झोंकीत राहूं नका. "गर्जेल तें पडेल काय, आणि बोलेल तें करील काय?" याप्रमाणें तुमच्या नुसत्या बातांनीं काम तडीस जाणार नाहीं. सर्वांनीं एका जुटीनें जर वरील कामास हात घातला तर तें पानास चुना लावण्याचे थांत तडीस न्याल! "पशुके होत पन्हय्या नरका कछुनाहि होय। नर जो आपकी करनी करे तो नरका नारायण होय॥" ही साधुवाणी पक्की लक्षांत ठेवा! पळें, घटका, प्रहर, दिवस, वर्षेंहीं निमूटपणें आपणांस मृत्यूच्या जवळ्याकडे हळू हळू लोटीत आहेत, हें मनांत वागवा! आणि आपलें आयुष्य फुकट न जाऊं देतां या सच्चिदानंद चराचरव्यापी श्रीकुणकेश्वराचे ठायीं दृढ भाव ठेवा! तो सर्वसिद्धिफलदाता, अज्ञानच्छेदक आणि भक्तवत्सल आहे हे लक्षांत ठेवा! त्याचें

ध्यान, भजन, पूजन आणि मनन करीत जा! ती साजिरी मूर्ति आपल्या हृदय कमलांत अखंड सांठवा! हे विश्वबीजा, हे दीनबंधो, हे मोक्षदाया अशा प्रकारें त्या श्रीकुणकोबाचा अनन्यभावें धांवा करा! ह्मणजे तोच जगन्निवास तुमच्या वाईट कर्मांपासून तुमची सुटका करील; व तो तुमच्या दुःखाचा वांटेकरी होईल, हें पक्कें लक्षांत ठेवा; व जन्मास आल्याचें सार्थक करा, नाहीं तर :–

**आला आला प्राणि जन्मासि आला।**
**झाला झाला वाढला थोर झाला।**
**केला केला व्यापही सर्व केला।**
**गेला गेला बापुडा व्यर्थ गेला॥ १॥**

समाप्त.

# रामजोशी कृत बोधपर लावण्या.

येथील प्रसिद्ध कविशिरोमणि रामजोशी यांचे नातू रा. पांडोबा जोशी यांजकडून दीर्घ प्रयत्नानें आम्हीं कांहीं अप्रसिद्ध असलेल्या लावण्या मिळविल्या यापैकीं कांहीं वाचकांच्या मनोरंजनार्थ खालीं दिल्या आहेत:—

## लावणी.

चाल साधी.

नरदेहा मध्यें येऊनि गड्या त्वां हित केलें नाहिं।
दार धनाचा लोभ सोडिशिल तरि साधल बा तुज
कांहिं ।। धृ ।।
हरिची माया अगाध जेथें ब्रह्मादिक फसले।
तूं तरि मानव तनुचे पामर त्यांतहि कामादिक वसले।
नानापरिचे विषय मनामध्यें येवुनिया घुसले।
काय तुझा पाड वेड्या गाधिज पराशरादिक तळिं बसेल।
या मदना वरि शुका सारिखे विरळे कुणि रुसले।
बाकी नर या भव पाशामध्यें किति लोळति बांधुनि कसले।
या साठींबा तुला सांगतों सावध मनि राहि।
रात्रंदिस उदकाहुनि चंचल आयू जातसे बा पाहि ।।नर।।१
तूं म्हणशिल या संसारामध्यें सुख पाहिन मोठें।

परंतु जितुकी वस्तु पहाशिल तितुकें जाणूणि घे खोटें।
अनुचित केलें अहित जनाची त्वां भरलिस पोटें।
जर करितां ही तनू घसरली नरतनु कोठें तूं कोठें।
चिरायु ह्मणशिल काळ मोजितो रात्रंदिस बोटें।
नायकिलें बा जगतिं तळीं या विषम विशाच्या हित घोटें
विषय वासना धराशिल परि हे नागवितिल साहि।
तुझी इंद्रीयें तुलाच होतिल बाधक परिणामी दाहि ॥नर॥२
बालपणामध्यें तनू घालविलि खेळुनिया सारि।
तरुणपणामध्यें बहर मारिला रांड तुला जहालि प्यारि।
ते तर जातिल उद्या निघुनिया दिवस गळ्या चारि।
मग घालविशिल बाहेर पैसा घरचो ह्मणशिल ह्मातारि!
कोण पुसतो घरांत नाहिं दंबडी ना ज्वारी।
रांड देतसे घरांत बाहेर देणेकरि तुजला ह्वाहि॥ नर॥ ३॥
वृद्धपणामध्यें पुत्रादिक तुज ह्मणतिल रे निबरा।
आणिक्ही वांचशील कुठवर करुनि जनाच्या किति कबरा
तुझ्या सुना तुज ह्मणतिल मेल्या ह्मातार्‍या लुबरा।
उगाच पड खाटेवर तुजला कशास व्हाव्या या खबरा।
शक्ति रहित तूं रांड घरांतुन गळा करूनि जबरा।
दरडाविल मग सोसुन पडशिल त्यांचा सांभाळुनि डंबरा।
जें झालें तें बरें न बापा परिणति विषमाहि।
या सांठिं मन सुमन करूनि कविरायाच्या पदिं शिरं
वाहि॥ नर॥ ४॥

## लावणी. २

" चा० मजवरती खचित आहे या स्त्रीचे प्रेम ते.
( संगित सौभद्र )"

रक्षुनिया धनसुतदारा, निजकरणी तोषिली ।
भवताल्या मिळउनि बारा, हीं पोरें पोषिली ।
ना देतिल तुजला थारा, त्वां मोठि तोषिली ।
किति सांगूं मानवारे, किति सांगूं मानवा ।
येऊनिया नर जन्मासी, कांहिं तरी जाणवा ॥ धृ ॥ रक्षु॥१॥
संसारचि सारा खोटा, कां होसी बावरा ।
या उदमा येईल तोटा, बा रे हावरा ।
काळाचा बसला सोटा, मग ह्मणसी हा त्वरा ।
दूर्धतिला खाणवारे, दूर्धतिला खाणवा ॥ येऊनिया ॥ २ ॥
तूं ह्मणशिल माझी रामा, सकुमार गोरटी ।
वंचुनिया कवडीदामा, नेतिल हे पोरटी ।
परिणामी तुझिया कामा, येईल का गोरटी ।
कविराया मानवारे, कविराया मानवा ॥ येऊनिया ॥ ३ ॥

## लावणी ३.

" चा० उठाजी स्नान संधेशी तुह्मांशि ऊशीर झाला. "

हरि पद वंदा, मग धंदा दुजा गोडरे ॥ धृ० ॥
दोदिवसाची, तनुसाची, धरा लाजरे ।

निजहित साधा, भवबाधा, टळो आजरे ।
धनसुतदारा, मुडदारा, करी वाजरे ।
मन हें भूलतें, नको भलतें, करूं काजरे ।
चुकविल पाळी, वनमाळी, महाराजरे ।
जन भोंदावा बांधावा, किती माजरे ॥
मद जिरवावा, मिरवावा किती साजरे ॥चा०॥
अजूनि डोळे झाक करावें ॥
रांडा पोरें कितिक भरावें ।
काळ मुखामध्यें तनु घसरावें ।
मग यदुपतिची स्मृति विसरावें ।
नरतनु तुमची काय भरावें ।
फट फट मंदा, सुख कंदा, मनी जोडरे ॥ हरि ॥ १ ॥
उंच जराचा, पदराचा, किति झोकरे ।
किति धगडीची, पगडीची, पुरे नोकरे ।
नौबदखाना, समजाना, दूजा शोकरे ।
करितानाचा, भजनाचा, तुझा बोकरे ।
हा तर टाका, न त्रिटाळा, जसा वोकरे ।
करिता जागा, मन बागामध्यें शोकरे ॥ चा० ॥
नर तनु तुमची काय शिराणी ।
पाहातां ही तर निपट विराणी ।
कां भुलला मती करूनि दिवाणी ।

कोणी निजहित मनाशी वाणी।
कवीरायाची लटकिन् वाणी।
बळकट बंदा, करि निंदात्मजी, होडरे ॥ हरि ॥ २ ॥

## लावणी. ४

"चा० मोहित झालो तुझ्या स्वरूपाला"
कां रे मनि माधवाचें, चरण धराना।
कीती कथींतों, हित कांहीं कराना ॥ धृ ॥ कारे ॥
नरतनू लाधली हें, सुकृत भरानें ॥
हरवितां आपूल्याची, करानें ॥
चंचल मन नोव्हे, स्थिर निकरानें।
हें वदती, श्रुती शास्त्र पुराणें।
झडकरीं सांभाळावें, हित चतुरानें।
भंगुनिया, परमार्थ सुखानें।
सुरपती मोहिला हो, विषयांगरानें।
शाप दिला मुनीच्या, कुमरानें।
सुतदारादि हें, बहु आदरानें।
वंचतितें, नुमजावें खरानें।
या भवसिंधूच्या, लहरी तराना।
हरिगुण कीर्तनी, रंग भराना ॥ कारे ॥ १ ॥

भगवत् भजकांचा, संग घडावा।
तच्चरणी, निजदेह पडावा।
तो नर भवा माजी बुडावा।
मग कधिसा परमार्थ रडावा।
श्रीगुरु चरणींच्या, नमुनि खडावा।
हरिहर नाम, सुमंत्र पढावा।
हें नकरानें जेणें, मदन चिडावा।
समर्थ हा तरीं, कां बिघडावा।
अरे तुमचा हा डोळा, कधिं उघडावा।
साधक हो मनि, भाव जडावा।
कां भवपाशीं हा, देह पिडावा।
भव भजनें, सगळाची मढावा।
हरिगुण गायकांच्या हृदंई शिराना।
सुखकर हा कविराय वराना ॥ कारे ॥ २ ॥

## लावणी ५.

" चा० कितिरे रडशिल रडतां रडतां नेत्र तुझे सुजले
( संगित शाकुंतल ) "

बापा अति हित कर गुरुशि भजावें, गुरुलागि यजावें ॥धृ॥
धंदा त्याविना नसावा दुसरा, गुरु पाइच विसरा।

नाहिं तरी बसल येखादा घसरा, करि गुरुचा आसरा ।
सारा आनंद दिवाळी दसरा, गुरु पाइच विसरा ।
त्याचे शेवेंतचि वपु झिजवावें गुरु लागि भजावें ॥बापा॥ १
माता तातादिक गुरुला गाती, ते मुक्तिस जाती ।
कांहीं मग नसे कुणाचे हाती, ही लटकीं नाती ।
मरती गुरुवाचोनि लाताखाती, ते नरका जाती ।
त्याला सुरवर समसुमन पुजावें, गुरु लागिं भजावें॥बापा॥२
एका गुरुराज कृपेची छाया दुर करिती माया ।
कैचा भव पाशाचि उकलाया, गुरुवांचुनि वाया ।
खोटी लेंकरें कुणाची जाया, गुरु माऊलि गाया ।
ऐसें कविराय सुमंत समजावें, गुरुलागि भजावें.॥ बापा ॥ ३

# वर्गणीदारांचीं नांवें.

रा. सा. श्रीधर महादेव काळे, सबॉर्डिनेट जज्ज, देवगड... ... १
रा. रा. श्रीपत रामचंद्र... ... १
,, अनंत जयराम पारकर. ... १
,, अनंत दादु आगणे.... ... १
,, अनंदराव मंगेश..... ... १
,, अनंदराव दिनानाथ.. ... १
,, अनंदराव विनायक... ... १
,, अंनाजी रामचंद्र.... ... १
,, अंताजी गोपाळ भावे.. ... १
,, अर्जुन गोविंद ... ... १
,, अर्जुन फत्ते परब.... ... १
,, अर्जुन सेमाजी बोरकर.. ... १
,, अमृत रामजी कदम.. ... १
,, अमरसिंग हरीसिंग.. ... १
,, आत्माराम आपाजी गांवकर. १
,, आत्माराम गणेश मुंज. ... १
,, आत्माराम काळोजी भाटकर १
,, आत्माराम बाळकृष्ण रेळे.... १
,, आत्माराम विनोबा.., ... १
,, आपा बाजी जोशी.. ... १
,, आपा सखाराम मिठकर.... १
,, आबा बाळोजी सुर्वे... ... १
,, आबाजी बाळोजी तावडे..... १
,, आबाजी दादाजी..... ... १
रा. रा. उमा साबाजी.... .... १
,, एकनाथ बापुजी.... .... १
,, एन्. भिकाजी...... ... १
,, एस्. दिनानाथ..... .... १
,, कानु रामजी... ... ... १
,, काशिनाथ बाळकृष्णजी गोरे १
,, काशीनाथ पांडुरंग... ... १
,, केरोबा रावजी...... ... १
,, केशव गोविंद... ... ... १
,, केशव रघुनाथ.... .... १
,, केशव बळवंत... ... ... १
,, केशव सुडकोजी भाटकर.... १
,, कृष्णनाथ काशिनाथ... ... १
,, कृष्णाजी अण्णाजी प्रभू...... १
,, कृष्णाजी अर्जुन दुखंडे.. ... १
,, कृष्णाजी सदोजी तावडे...... १
,, कृष्णाजी सदाशिव बिडये.... १
,, कृष्णाजी गणेश साठे... ... १
,, कृष्णाजी लक्ष्मण.... ... १
,, कृष्णाजी गोविंद फाटक, नाजर, देवगड... ... ... १
,, कृष्णाजी देवजी आवळेगांवकर १
,, कृष्णाजी वामन अभ्यंकर.... १
,, कृष्णा राघोजी पाटेल... ... १
,, कृष्णा रणछोड..... .... १

रा. रा. खंडू रामजी पेडणेकर.... १
,, खंडो ज्ञानेश्वर.. ... ... १
,, गजानन गोविंद. ... ... १
,, गजानन बापुजी ... ... १
,, गणपत सखाराम.... ... १
,, गणपत बाळाजी मालगुंडकर. १
डाक्तर गणपतराव बाबाजी, सिद्धपूर १
रा. रा. गणपत सखाराम ... १
रा. सा. गणपतराव व्यंकटेश ... १
रा. रा. गणपत कृष्णाजी. ... १
,, गणपत सुंदर तळपदे.. ... १
,, गणपतराव बाजीराव राव.... १
,, गणपतराव सदानंदजी. ... १
,, गणु लक्ष्मण घाडी... ... १
,, गणेश हरी भावे.... ... १
,, गणेश भाऊ.. ... ... १
,, गणेश सखाराम.... .... १
,, गणेश नारायण..... ... १
,, गुंडो रामचंद्र.. ... ... १
,, गुंडो नारायण... ... ... १
,, गुणाजी रामजी साळवी. ... १
,, गुणाजी राजबा राणेराव .... १
,, गेनु तावजी.. .... .... १
,, गोपाळ भिवा पारकर.. .... १
,, गोपाळ रामजी वराडकर.... १
,, गोपाळ बळवंत.. .... १
,, गोपाळ शिवराम. .... १
,, गोपाळ मुरहर नाईक ... १

रा. रा. गोपाळ भगवंत.. .... १
,, गोपाळ मोरेश्वर.. .... १
,, गोपाळ शंकर... .... १
,, गोपाळ बाबाजी कुळकर्णी.... १
,, गोपाळ धोंडदेव.. ... १
,, गोविंद धोंडू घाडी .. १
,, गोविंद प्रतापजी नाईक साठम.... .... ... २
,, गोविंद नारायण मोरे .... १
,, गोविंद पद्माकर.. .... १
,, गोविंद जनार्दन.. ... १
,, गोविंद मुकुंद..... .... १
,, गोविंद बाबाजी.. .... १
,, गोविंद राघो.... .... १
,, गोविंद सखाराम... ... १
,, गोविंद एम्. दामले ... १
,, गोविंद बाळकृष्ण.. ... १
,, गोविंद देवजी नागवेकर. .... १
,, गंगाधर भिकाजी. .... १
,, गंगाराम सखाराम वाणी. ... १
,, चिंतामण रघुनाथ .... १
,, चिंतामण गणेश.. .... १
,, चिंतामण गोपाळ. ... १
,, चुनिलाल एम्. स्टेशनमास्तर सिद्धपूर.... ... .... १
,, जगन्नाथ कृष्णराव .... १
,, जगन्नाथ अंतोबा.. .... १
,, जगन्नाथ बापुजी. .... १

रा. रा. जनार्दन गोविंद इंदुळकर १
,, जयराम केशव... .... १
,, जयराम जनार्दन मंत्री .... १
,, जनोबा वकील, देवगड. .... १
,, जानू विश्राम .... .... १
,, जी. पेडणेकर .... .... १
,, जिवाजी काशिबाराव घाग... १
,, झिलु गोपाळ .... .... १
,, डब्ल्यू. एम्. भिकाजी ..., १
,, तानाजी भाकु भुरी .... १
,, तानाजी मुकादम.. .... १
,, तानाजी यशवंत.. .... १
,, तातोजी आबाजी तावडे .... १
,, तानोबा सोनजी परब, डोंगरेकर.. .... .... १
,, तुकाराम सखाराम पोवार... १
,, तुकाराम लक्ष्मण. ... १
,, तुळाजी यशवंत परब. .... १
,, त्रिंबक बाबुलजी.. .... २
,, त्रिंबक भिमाजी.. .... १
,, त्रिंबक हरी.. .. .... १
,, त्रिंबक बाळकृष्ण. ..... १
,, दत्तात्रय महादेव.. .... १
,, दत्तात्रय कृष्ण... .... १
,, दत्ताजी भिवजी नाईक शेळार १
रा. बा. दाजी गंगाजी राणेराव नारिंग्रेकर ... ... १
रा. रा. दाजी शिवाजी परब.... १
रा. रा. दाजी भावोजी राणेराव नारिंग्रेकर... .... .... १
,, दाजी रामजी कदम. .... १
,, दाजी येसुजी नाईक. .... १
,, दाजी बाळाजीराव सुर्वे. .... १
,, दादा जोती. ... .... १
,, दादाजी रघुनाथजी. .... १
,, दामोदर हरगोविंद ... १
,, दामोदर खंडेराव. .... १
,, दिनकर गणेश... .... १
,, देवजी यशवंत शेलार. .... १
,, देवजी तानाजी भुरी... .... १
,, देवजी बावलोजी.. .... १
,, देवजी गोरक्ष सावंत. .... १
,, देवजी लक्ष्मण.... .... १
,, देवजी बाळू पाटेल. ... १
,, भाकु संभाजी कदम.. .... १
,, भाकु गोपाळ शेट. ... १
,, भाकु महादु. ... .... १
,, भाकु जिवाजी.... ... १
,, भाकोजी सोनजी घाडी. ... १
,, भाकोजी नारायण ... १
,, भाकोजी हवाजी राणेराव नारिंग्रेकर ... ... १
,, धोंडु विठ्ठल कामत ... १
,, धोंडु रगमजी सांवत ... १
,, धोंडो नारायण... ... १
,, धोंडो अमृत... ... १

रा. रा. धोंडो नारायण... ... १
,, धोंडो लक्ष्मण... ... १
,, धोंडो कानोजी... ... १
रा. सा. नथु बापुजी... ... १
अइजम नब्बी जमाल... ... १
रा. रा. नरसु आबाजी ... १
,, नरहर नारायण ... १
,, नाना बापुजी... ... १
,, नाना विठोबा... ... १
,, नानाभाई सदानंदपालेकर.. १
,, नानाभाई रघुनाथ. ... १
,, नामदेव राजाराम. ... १
,, नारायण बाबाजमिाळकर.. १
,, नारायण रामजी भोवरे ... १
,, नारायण महादेव वाणी ... १
,, नारायण भागोजी ... १
,, नारायण संभाजी ... १
,, नारायण उपेंद्र... ... १
,, नारायण धोंडु तावडे ... १
,, नारायण भिकाजी ... ३
,, नारायण रामजी ... १
,, नारायण वामन. ... १
,, नारायण सखाराम ... १
दाक्तर नारायणराव जाधव..... १
रा. रा. नारायण रामचंद्र ... १
,, नारायण नरसु ... १
,, नारायण भानजी ... १
,, नारायण बाळाजी ... १
रा. रा. नारायण रणछोड ... १
,, नारायण गोपाळ जामसंडेकर १
,, नारायण लक्ष्मण मानकर. १
,, नारायण केरोबा. ... १
,, नारायण शामराव ... १
,, नारायण बाबाजी. ... १
,, नारायण आत्माराम सापळे. १
,, निळकंठ सखोजी सावंत ... १
,, निळोपंत फोजदार सिद्धपूर. १
,, पर्शराम बापुजी ... १
,, पंढरीनाथ शामराव ... १
,, पांडुरंग बापुजी तावडे ... १
,, पांडुरंग बाबशेट तेली ... १
,, पांडुरंग शंकरजी ... १
,, पांडुरंग राघोबा ... १
,, पांडुरंग रामनाथ खोटे ... १
,, पांडुरंग सदाशिव ... १
,, पांडु सोमजी पाटेल ... १
,, पांडोबा महादजी कदम ... १
,, पुरुषोत्तम सखारामजी ... १
,, पुरुषोत्तम येसोबा ... १
,, फकीर लक्ष्मण पाटेल ... १
,, फकीर नारायण ... १
,, बळवंत सदाशिव राणे ... १
,, बळवंत रामचंद्र राणेराव
नारिंग्रेकर ... ... १
,, बळवंत लक्ष्मण.... .... १
,, बळवंत रावजी... ... १

रा. रा. बळवंत तुकाराम ... १
,, बळवंत गणेश वै ... १
,, बाजी धोंडजी राणेराव ... १
,, बापू बाळाजी... ... २
,, बापू भाऊ... ... ... १
,, बापू धर्माजी वंजारे ... १
,, बापुजी धोंडजी गुरव ... १
,, बापुजी विठोजी नाईक शेलार १
,, बाबाजी रामजी... ... १
,, बाबाजी धाऊ चाफेखोलकर १
,, बाबाजी धाकु चवकेकर ... १
,, बाबाजी महादु पेडणेकर ... १
,, बाबाजी गोविंद चव्हाण ... १
,, बाबाजी आपाजी बागवे ... १
,, बाबाजी रामजीराव ... १
,, बाबाजी आपाजी सावंत ... १
,, बाबु शिवाजी परब ... १
,, बाबु धनाजी... ... १
,, बाबु पांडु जामसंडेकर ... १
,, बाबु नारायण... ... १
,, बाबु कृष्णाजी शेट वाणी ... १
,, बाबु गोपाळजी ... १
,, बाळकृष्ण यशवंत ... ... १
,, बाळकृष्ण विठ्ठल ... १
,, बाळकृष्ण विठुजी ... १
,, बाळकृष्ण लाडोजी ... १
,, बाळकृष्ण आबाजी ... १
,, बाळकृष्ण पांडोबा परब ... १

रा. रा. बाळकृष्ण चिमणाजी... १
,, बाळकृष्ण गणपतराव राउत. १
,, बाळकृष्ण दादोबा धुरंधर... १
,, बाळकृष्ण धोंडु ... १
,, बाळकृष्ण गोपाळ ... १
,, बाळा धाकु घाग ... १
,, बाळाजी कृष्णराव ... १
,, बाळाजी कृष्णनाथजी ... १
,, बाळाजी लक्ष्मण ... १
,, बाळाजी धाकुजी मुणगेकर. १
,, बाळोजी भिकाजीराव ... १
,, भगवंत धोंडदेव ... १
,, भगवंत मार्तंड... ... १
,, भगवंतराव रामचंद्र ... १
,, भगवान भिकाजी शेट्ये ... १
,, भगवान लक्ष्मण अंब्रे ... १
,, भगवान पांडुरंग ... १
,, भाई गोपाळराव ... १
,, भाऊ चिमणाजी ... १
,, भाऊ दौलतराव ... १
,, भाऊ धाकोजी पवार. ... १
,, भाऊ सावंत ... ... १
,, भागु बापुजी परबु ... १
,, भिकाजी बाबाजी सावंत ... १
,, भिकाजी यशवंत ... १
,, भिकु बाबाजी देसाई ... १
,, भिकु बाबाजी पालव ... १
,, भिकु विठोबा ... ... १

रा. रा. भिवा राघोबा सांवत ... १
,, भिवा तुळाजी सांवत ... १
,, भिवा महादेव राणेराव ... १
,, भिवा बापुजी सांवत ... १
,, भोजु कृष्णाजी... ... १
,, मदुसुदन मुकुंदजी ... १
,, मनुलाल लालचंद ... १
,, महादेव अर्जुन मालप ... १
,, महादेव रामचंद्र ... १
,, महादेव नर्सिह... ... १
,, महादेव रमाकांत ... १
,, महादेव राघो... ... १
,, महादेव भिकाजी आपटे ... १
,, महादेव नारायण कोटारे ... १
,, महादेव रामजी पेडणेकर.... १
,, महादेव रामजी ... १
,, महादु नानुजी ... ... १
,, मल्हारी गोविंद मोहिते ... १
,, मुकुंद महादु सुर्वे... ... १
,, मुकुंद राघोजी राणे ... १
,, मुरारी शिवाजी सांवत ... १
,, मोरेश्वर अनंत... ... १
,, मोरेश्वर शिवराम ... १
,, मोरेश्वर विठोबा साकरदांडे. १
,, मोरो अनंत ... ... २
,, मोरोपंत वकील देवगड ... १
,, यशवंत रामचंद्र ... १
,, यु. रामचंद्र ... १

रा. रा. येसु निळाजी नाईक बान्ये १
,, येसु सखाराम सांवत ... १
,, येसु उमाजी अडवळ ... १
,, येसु बापुजी ... १
,, रघुनाथ दाजी जोशी ... १
,, रघुनाथ सखाराम ... १
,, रघुनाथ नारायण ... १
,, रघोजी लाडोजी आंगणे ... १
,, रखोजी महिमाजी कदम ... १
,, रत्नोजी सांवत ... १
,, राघो बाबाजी तावडे ... १
,, राघो बाबाजी मयेकर ... १
,, राजबा गोविंद सांवत ... १
,, राजबा सांवत ... १
,, राजेंद्रराव बापुजी ... १
,, राजाराम माधवराव राणे राव
मारिंमेकर ... १
,, राजाराम मुकुंद ... १
,, राजाराम यशवंत ... १
,, रामचंद्र महिपतराव ... १
,, रामचंद्र नारायण ... १
,, रामचंद्र येसु ... १
,, रामचंद्र बापुजी पावाडे ... १
,, रामचंद्र गणेश भिडे ... १
,, रामचंद्र पर्शराम ... १
,, रामचंद्र विश्वनाथ ... १
,, रामचंद्र तुकाराम ... १
,, रामचंद्र भिकाजी ... १

रा. रा. रामचंद्र सखाराम ... १
,, रामचंद्र विठ्ठल ... १
,, रामचंद्र नारायण शेट लाध्ये १
,, रामचंद्र व्यंकटेश ... १
,, रामचंद्र हरजी ... १
,, रामचंद्र नारायण ... १
,, रामचंद्र पांडुरंग बागवे देसाई मसुरेकर. ... ... २
,, रामस्वामी ... ... १
,, रामशंकर गोविंदराव ... १
,, रामजी अर्जुन तावडे ... १
,, रामजी बच्याजी नाईक... १
,, रामजी दादबाराव ... १
,, रामजी जायाजी सावंत ... १
,, रामजी महादु... ... १
,, रामजी बापुजिराव घाग ... १
,, रामजी लक्ष्मण. ... १
,, रामजी हरी पाटकर ... १
,, रामकृष्ण सखाराम ... १
,, रामेश्वर चिटको ... १
,, रावजी अंबाजीराव ... १
,, रावजी महादेव... ... १
,, रावजी रामचंद्र ... १
,, रावजी रामचंद्र गाईकवाड बापर्डेकर. ... ... १
,, लक्ष्मण रामजीराव गाईकवाड सबइन्सपेक्टर पी. डब्ल्यू. डी. सिद्धपूर ... ... ७

रा. रा. लक्ष्मण गणपत... ... १
,, लक्ष्मण विश्राम पवार ... १
,, लक्ष्मण अर्जुन केळकर ... २
,, लक्ष्मण बाबाजी चव्हाण ... १
,, लक्ष्मण कानु मोंडकर ... २
,, लक्ष्मण काळशेकर ... १
,, लक्ष्मण सखोजीराव गोड ... १
,, लक्ष्मण रावजी ... ... १
,, लक्ष्मणराव पाकणकर ... १
,, लक्ष्मण अंबाजी... ... ... १
,, लालदास दामोदरदास ... १
,, वामन पर्शराम ... १
,, वामन व्यंकटेश ... १
,, वासुदेव चिंतामण बापट नाशिंग्रे. ... ... १
,, वासुदेव नारायण वांयगणकर. १
,, विश्वनाथ वासुदेव ... १
,, विश्राम गोविंद... ... १
,, विश्राम भिकाजी ... १
,, विश्राम बापुजी... ... १
,, विश्राम राघोबा... ... १
,, विठ्ठल पांडुरंग फनसुफे ... १
,, विठ्ठल लक्ष्मण ... ... १
,, विठ्ठल नारायण... ... १
,, विठ्ठल नारायण... ... १
,, विठु बाबाजी हिंदळेकर ... १
,, विठु गंगाराम... ... १
,, विठु भाकु ... ... १

रा. रा. विठु नारायण तांबे ... १
,, विठोबा गोपाळ दुभवडकर... १
,, विठोबा येसुशेट गांधी ... १
,, विनायक बाबाजी ... १
,, विनायक अर्जुन घाडी ... १
,, विनायक गोविंद शहाणे ... १
,, विनायक रघुनाथराव ... १
,, विनायक रघुनाथ ... १
,, विष्णु गोपाळ... ... १
,, विष्णु शामाजी तारी ... १
,, विष्णु भिवा ... ... १
,, विष्णु संभाजी पाटेल ... १
,, विष्णु लक्ष्मण... ... १
,, विष्णु विश्वनाथ ... १
,, विष्णु रामजी आमरे ... १
,, व्यंकाजी विठ्ठल ... १
,, व्यंकटराव नायब सुभे ... १
,, शामराव त्रिंबक ... १
,, शामराव पांडुरंग ... १
,, शिवराम गणेश ... १
,, शिवराम गोपाळ ... १
,, शिवराम निळकंठ ... १
,, शिवलाल गिरधरलाल ... १
,, शंकरराव भोसले ... १
,, सखाराम आपाजीराव ... १
,, सखाराम सुभानजी राणेराव नारिंगेकर ... ... १
,, सखाराम गोविंद बागवे ... १

रा. रा. सखाराम बाळोजी देवकर १
,, सखाराम भिकाजी ... १
,, सखाराम भागोजी ... १
,, सखाराम भिकशेट ... १
,, सखाराम अण्णाजी ... १
,, सखाराम रामजी ... १
,, सखाराम येसु... ... १
,, सजनोजी सर्दोजी ... १
,, सदाशिव गणेश जोशी ... १
,, सदानंद कृष्णनाथ ... १
,, सदु संतुजी वाणी ........ १
,, सादु बापुजी ... ... १
,, साबाजी सुरबाजी सावंत ... १
,, साबाजी सोनजी बोटले ... १
,, साबाजी विठ्ठल... ... १
,, साबाजी धाकु... ... १
,, सांवळाराम शिवराम. ... १
,, सिताराम बाबु गावडे ... १
,, सिताराम महादु बाबर ... १
,, सिताराम संभाजीराव ... १
,, सिताराम विठ्ठल शेट ... १
,, सिताराम लक्ष्मणजी ... १
,, सिताराम वासुदेवजी ... १
,, सिताराम कृष्णराव ... १
,, सिदराम बळवंत कामत ... १
,, सिताराम आपाजी ... १
मिस्तर सिद्दी अकबर. ... १
रा. रा. सिवा कृष्णाजी ... १

रा. रा. सुंदरराव रामचंद्र...... १
,, सुंदरराव रावजी... ... १
,, सुंदरराव मदन... ... १
,, सुदामा उदाजी... ... १
,, सुर्बा नानजी... ... १
,, सुर्बा गोविंद पाटकर ... १
,, सोमजी आबा राणे ... १
,, सोमजी रामचंद्र. ... १
,, सोमजी सावत... ... १
,, सोनु गोविंद... ... ... १
,, संतु कृष्णाजी जाधव. ... १
,, संभाजी महादु बागवे देसाई
मसुद्रेकर... ... ... १
,, संभाजी सदु कदम... ... १

रा. रा. संभाजी नारायण...... १
,, हरी गोपाळ परकर. ... १
,, हरी गोपाळ भोंसले. ... १
,, हरी कृष्णाजी कासार ... १
,, हरी पांडुरंग जाधव ... १
,, हरी विश्राम... ... १
,, हरी अण्णाजी.... ... १
,, हरी नरहर मोकाशी. ... ४
,, हरी बापुजी कबीर ... १
,, हरिश्चंद्र विठोबा... ... १
,, हरिश्चंद्र रामकृष्ण. ... १
,, हरिश्चंद्र शंकर... ... १
,, हरिश्चंद्र विनायक ... १
,, हरिबा धोंडुजी गवळी ... १